रायगड, नवी मुंबई
राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३२१
www.ramprahar.com
◆ मंगळवार, ९ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## टीएमसीच्या २० खासदारांनीही बनवला वेगळा गट



**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या विधानसभा विधानसभा निवडणुकीनंतर तृणमूल काँग्रेसच्या आमदारांमध्ये फूट पडल्यानंतर आता पक्षाच्या खासदारांमध्येही फूट पडली आहे. माजी मुख्यमंत्री तथा पक्षाध्यक्ष ममता बॅनर्जी यांना हा आणखी एक धक्का आहे. तृणमूल काँग्रेस बंडखोर खासदारांची केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांच्या घरी बैठक झाली. या बैठकीत पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री शुभेंदू अधिकारीदेखील उपस्थित होते. बैठकीनंतर तृणमूल काँग्रेसच्या वरिष्ठ खासदार काकोली घोष दस्तीदार यांनी लोकसभा अध्यक्षांना पत्र दिले. दस्तीदार यांनी वेगळा गट स्थापन केल्याचा दावा केला असून यामुळे देशाच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. लोकसभेत तृणमूल काँग्रेसचे एकूण २८ खासदार आहेत. काकोली यांनी म्हटलेय की, २० खासदारांनी सह्या केलेले पत्र लोकसभा अध्यक्षांना दिले.

### अंतरंग
पनवेलमध्ये आज रायगड मॉडेल जिल्हा कार्यशाळा/२
दक्षिण रायगडात पावसाची हजेरी/५
अफगाणिस्तानवर टीम इंडियाचा विक्रमी विजय/८

# राज्यातील रेल्वेमार्ग होणार फाटकमुक्त

## पायाभूत सुविधा उभारण्याचे मुख्यमंत्र्यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील एकाही रेल्वे मार्गावर फाटक राहता कामा नये. रेल्वे फाटकमुक्त महाराष्ट्रासाठी आवश्यक त्या सर्व पायाभूत सुविधा युद्धपातळीवर उभारण्यात याव्यात, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि.८) दिले. महाराष्ट्र रेल्वे पायाभूत सुविधा विकास महामंडळामार्फत (महारेल) राज्यात उभारण्यात येणाऱ्या एकूण १३१ रेल्वे उड्डाणपुलांपैकी पहिल्या टप्प्यातील ६५ कामांना मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत मंजुरी देण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीला सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंह राजेभोसले (व्हीसीद्वारे), राज्यमंत्री इंद्रनील नाईक आणि आमदार प्रसाद लाड उपस्थित होते. सार्वजनिक बांधकाम आणि नगरविकास विभागाच्या अखत्यारीतील रस्त्यांवर रेल्वे उड्डाण पूल, पादचारी पूल आणि रेल्वे मार्गाखालील (अंडर पास) रस्ते महारेलमार्फत बांधले जाणार आहेत.

याबाबत बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, पहिल्या टप्प्यात मान्यता दिलेल्या ६५ कामांपैकी ज्या रस्त्यांवर २५ हजार ते एक लाखापर्यंत 'टीव्हीयू' (ट्रेन व्हेईकल युनिट-वाहनांची वर्दळ) आहे आणि जिथे कमीत कमी भूसंपादन आवश्यक आहे, अशी कामे प्राधान्याने हाती घेऊन ती तातडीने पूर्ण करावीत. महानगरांमध्ये रेल्वे मार्गांच्या आजूबाजूला वेगाने होणारे शहरीकरण लक्षात घेऊन नागरिकांच्या सुलभ दळणवळणासाठी या पायाभूत सुविधा मैलाचा दगड ठरतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



वाढत्या शहरीकरणाचा विचार करता राज्यातील विविध शहरांमध्ये एकूण ८० रेल्वे पायाभूत सुविधांची कामे नियोजित करण्यात आली आहेत. यामध्ये सर्वाधिक मुंबई महानगर क्षेत्रात १७, पुणे शहरात १५, नागपूर १३, नाशिक व अमरावती प्रत्येकी पाच, सांगली चार, तर छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, धुळे, लातूर व परभणी येथे प्रत्येकी तीन कामे होणार आहेत. याशिवाय सोलापूर आणि जळगावमध्ये प्रत्येकी दोन, तर अहिल्यानगर व नांदेड शहरात प्रत्येकी एक काम केले जाईल. या शहरांमधील कामांच्या पडताळणीसाठी संबंधित महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांची संयुक्त समिती स्थापन करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. ही समिती पडताळणी करून अहवाल दिल्यानंतर महारेल प्रत्यक्ष काम सुरू करेल.

नागपूर शहरात उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलांवर भविष्यातील वाहनांची वाढती संख्या पाहता चौकांमध्ये वाहतूक कोंडी होण्याची दाट शक्यता आहे, त्यामुळे तिथे आतापासूनच कोंडी टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशा सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या तसेच अमरावती-बडनेरा मार्गावरील जुना झालेला रेल्वे उड्डाणपूल पाडून त्या ठिकाणी आधुनिक तंत्रज्ञानाचा नवीन पूल उभारण्याचे आदेश त्यांनी दिले.

या प्रकल्पांच्या आर्थिक नियोजनासाठी 'हुडको'कडून कर्ज उपलब्ध करून घेतले जाणार आहे. हुडकोने स्वतः बँकांकडून कर्ज न घेता वेगळी वित्तीय व्यवस्था उभी करावी आणि बाजारातील स्पर्धेचा अंदाज घेत शासनाला कमी व्याजदराने कर्ज उपलब्ध करून द्यावे, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले तसेच 'महारेल' हे महामंडळ पूर्णपणे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आणण्याची प्रशासकीय प्रक्रिया गतीने पूर्ण करण्याचे निर्देश देऊन महारेलने पूर्ण केलेल्या कामांची देयके राज्य शासनाने तातडीने अदा करावीत, अशा सूचना दिल्या.




# भाजप उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणीची मासिक बैठक

## ■ विविध विषयांवर विचारविनिमय; उपक्रमांचे नियोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष उत्तर रायगड जिल्हा कार्यकारिणीची मासिक बैठक पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी (दि.८) पनवेल येथे झाली. आगामी संघटनात्मक कार्यक्रम, जनसंपर्क अभियान तसेच विविध उपक्रमांच्या नियोजनाच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वपूर्ण ठरली.

यावेळी व्यासपीठावर भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा सरचिटणीस तथा महापौर नितीन पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल महापालिका सभागृहनेते व जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, अनुसूचित जमाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सीताराम चौधरी, किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सागर सांगडे, ओबीसी सेल अध्यक्ष राजेश भगत खोपोलीचे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे आदी उपस्थित होते. बैठकीला जिल्हा कार्यकारिणीचे पदाधिकारी, विविध सेल व मोर्चांचे अध्यक्ष, मंडळ अध्यक्ष उपस्थित होते.

या बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रातील सरकारच्या १२ वर्षपूर्तीनिमित्त राबविण्यात येणाऱ्या विविध जनजागृती व जनसंपर्क कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. केंद्र सरकारने गेल्या १२ वर्षांत देशाच्या विकासासाठी, पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी, गरीब कल्याणासाठी, महिला सक्षमीकरणासाठी तसेच आत्मनिर्भर भारताच्या संकल्पनेला बळ देण्यासाठी केलेल्या कार्याची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले तसेच वृक्षारोपण अभियान, आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम प्रत्येक मंडळ स्तरावर प्रभावी नियोजन करून कार्यक्रम यशस्वी करण्याचे निर्देश देण्यात आले.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पक्षाच्या विचारधारेचा प्रसार करताना केंद्र व राज्य सरकारच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्यासाठी कार्यकर्त्यांनी अधिक सक्रियपणे काम करावे, असे आवाहन केले.

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी आगामी काळातील संघटनात्मक कार्यक्रमांची रूपरेषा मांडत सर्व पदाधिकाऱ्यांनी परस्पर समन्वयातून पक्षाची ताकद अधिक वाढविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले. प्रत्येक कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नियोजनबद्ध कामकाज, कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग आणि जनतेशी सातत्यपूर्ण संपर्क यावर भर देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. बैठकीचा समारोप आगामी कार्यक्रम यशस्वी करण्याच्या निर्धारासह करण्यात आला.

# मुंबई विमानतळावर विदेशी प्राण्यांची तस्करी उघड

## बँकॉकवरून आणलेल्या २९ दुर्मीळ वन्यजीवांची सुटका

**मुंबई : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी सीमाशुल्क विभागाने अत्यंत सतर्कतेने कारवाई करत वन्यजीव तस्करीचा पर्दाफाश केला आहे. बँकॉकहून आलेल्या एका भारतीय प्रवाशाच्या सामानातून तब्बल २९ विदेशी आणि दुर्मीळ प्रजातींचे वन्यजीव जप्त करण्यात आले आहेत, असून संबंधित प्रवाशाला ताब्यात घेण्यात आले.



विमानतळावर नियमित तपासणी सुरू असताना अधिकाऱ्यांना बँकॉकवरून आलेल्या एका प्रवाशाच्या हालचाली संशयास्पद वाटल्या. त्यामुळे त्याला अडवून सामानाची तपासणी करण्यात आली. सुरक्षा अधिकाऱ्यांनी जेव्हा त्याची सुटकेस उघडली, तेव्हा आत अत्यंत अमानुषपणे विदेशी प्राणी कोंबून ठेवल्याचे उघडकीस आले. या सामानातून एक गिबन, मेलानिस्टिक खार, बॉल पायथन आणि इगुआना यांसारखे प्राणी बाहेर काढण्यात आले. हे सर्व प्राणी बॅगेच्या आत अत्यंत बेमालूमपणे आणि दाटीवाटीने लपवण्यात आले होते. गुदमरलेल्या अवस्थेत असलेल्या या सर्व जिवांना सुरक्षित वातावरणात आणून त्यांच्यावर तातडीने प्राथमिक वैद्यकीय उपचार करण्यात आले.

## मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत 'समर्थ'ची बाजी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत पुन्हा एकदा मेघराज राजेभोसले यांच्या नेतृत्वाखालील समर्थ पॅनेलने बाजी मारली आहे. या पॅनलमधील सर्व उमेदवार विजयी झाले आहेत.

१७ जागांसाठी ही निवडणूक लढण्यात आली, ज्यात तीन जागा बिनविरोध झाल्या होत्या. त्यामुळे १४ जागांसाठी मतदान प्रक्रिया होऊन निकाल जाहीर झाला आहे.

## निवडक

### वितळलेले स्टील अंगावर पडून आठ मजुरांचा मृत्यू

**विशाखापट्टणम :** आंध्र प्रदेशच्या विशाखापट्टणम येथील राष्ट्रीय इस्पात निगम लिमिटेडच्या विझाग स्टील प्लांटमध्ये सोमवारी (दि.८) भीषण स्फोट झाला. यावेळी लागलेल्या आगीमुळे वितळलेल्या स्टीलची गळती झाली आणि हे लिक्विड स्टील अंगावर पडून आठ कर्मचाऱ्यांचा मृत्यू, तर अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी या दुर्घटनेबाबत दुःख व्यक्त केले असून मदतकार्यामध्ये समन्वय राखण्याची सूचना संबंधित विभागांना दिली आहे.

### लाईट गेल्याने घराबाहेर झोपलेल्यांना ट्रॅक्टरने चिरडले

**पाटणा :** बिहारच्या सारण जिल्ह्यातील मशरख नगर पंचायत परिसरात वीजपुरवठा खंडित झाल्याने घराबाहेर झोपलेल्या लोकांना ट्रॅक्टरने चिरडले. या भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू आणि अनेक जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू असून यातील अनेकांची प्रकृती चिंताजनक आहे. त्यामुळे मृतांच्या संख्येत वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. अपघातानंतर चालक फरार झाला असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत.


# अरबी समुद्रात चक्रीवादळाची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यात मान्सूनच्या आगमनाची जोरदार चाहूल लागली असतानाच अरबी समुद्रातील हवामानातील घडामोडींनी हवामान तज्ज्ञांची चिंता वाढवली आहे. अरबी समुद्रात तयार झालेल्या सायक्लोनिक सर्क्युलेशनचे कमी दाबाच्या क्षेत्रात आणि पुढे चक्रीवादळात रूपांतर होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. त्यामुळे मान्सूनच्या पुढील प्रवासावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार केरळ आणि महाराष्ट्र किनारपट्टीपासून काही अंतरावर अरबी समुद्रात सायक्लोनिक सर्क्युलेशन सक्रिय झाले आहे. या प्रणालीची टर्फ लाइन महाराष्ट्राच्या किनारपट्टीला स्पर्श करत उत्तरेकडे सरकत आहे. गोव्याच्या समुद्रकिनाऱ्याजवळ निर्माण झालेली ही स्थिती पुढील काही दिवसांत अधिक तीव्र होऊ शकते.

सध्याचे सायक्लोनिक सर्क्युलेशन कमी दाबाच्या पट्ट्यात रूपांतरित होण्याची शक्यता असून त्यानंतर ते अधिक तीव्र होऊन चक्रीवादळाचे स्वरूप धारण करू शकते. हवामान विभाग आणि तज्ज्ञ या घडामोडींवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. ही प्रणाली समुद्राच्या आतल्या भागात किंवा गुजरातच्या दिशेने सरकू शकते. १५ जूनच्या आसपास या संदर्भातील चित्र अधिक स्पष्ट होण्याची शक्यता आहे.



मुंबईकरांसाठी दिलासादायक बाब म्हणजे मुंबई आणि उपनगरांमध्ये १० जूनच्या आसपास मान्सून दाखल होण्याची शक्यता कायम आहे. वातावरण मान्सूनसाठी अनुकूल असून त्यात सध्या कोणताही मोठा बदल अपेक्षित नाही. मान्सूनच्या आगमनानंतर सुरुवातीच्या टप्प्यात चांगल्या पावसाची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

कोकण किनारपट्टीसह मुंबई परिसरात ११ आणि १२ जूनपर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रातही वादळी वाऱ्यांसह जोरदार पाऊस पडू शकतो. त्यामुळे नागरिकांनी आणि प्रशासनाने सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दुसरीकडे मराठवाडा आणि विदर्भातील नागरिकांना अद्याप मान्सूनसाठी थोडी प्रतीक्षा करावी लागणार आहे. मध्य महाराष्ट्रात मान्सूनपूर्व पावसाच्या रिमझिम सरी कोसळतील, तर उत्तर महाराष्ट्रात १५ जूनपर्यंत मोठ्या पावसाची शक्यता कमी असल्याचे सांगितले जात आहे. या भागांत ऊन-पावसाचा खेळ कायम राहण्याची शक्यता आहे.

दरम्यान, केरळमध्ये ४ जून रोजी आणि महाराष्ट्रात ६ जून रोजी मान्सून दाखल झाल्यानंतर त्याची वाटचाल वेगाने सुरू आहे, मात्र अरबी समुद्रातील संभाव्य कमी दाबाचे क्षेत्र किंवा चक्रीवादळ विकसित झाल्यास मान्सूनच्या पुढील प्रवासात काही प्रमाणात अडथळे निर्माण होऊ शकतात, असे तज्ज्ञांचे मत आहे.

## कशेडी घाटात अपघातामध्ये एकाचा मृत्यू, महिला गंभीर

**पोलादपूर : प्रतिनिधी**

भरधाव कार पुढे जाणाऱ्या डंपरच्या मागील भागात घुसून एकाचा मृत्यू,तर महिला गंभीर जखमी झाल्याची घटना सोमवारी (दि.८) मुंबई-गोवा महामार्गावर कशेडी घाटात दुपारी १च्या सुमारास घडली.

निकेश बालन असे अपघातात मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे नाव असून त्याची आई लिसी बालन (वय ६३, दोघेही रा. कल्याण) गंभीर जखमी झाली आहे. त्यांच्या कारची (एमएच ०५सीए ३३६७) मागे व दर्शनी भागात नंबरप्लेट नसलेल्या डंपरला धडक बसली. कशेडी पोलिसांनी दोघांनाही पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले होते, मात्र निकेश याचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली, तर आई लिसी बालन यांना गंभीर दुखापत झाल्याने अधिक उपचारासाठी एमजीएम हॉस्पिटल कळंबोली (पनवेल) येथे पाठवण्यात आले आहे.

(सविस्तर वृत्त पान ५ वर..)

# इंडिया आघाडीत बिघाडी कायम!

## काही पक्षांच्या नेत्यांची बैठकीला दांडी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दीर्घ काळानंतर इंडिया आघाडीमधील घटक पक्षांची बैठक सोमवारी (दि.८) दिल्लीत झाली. या बैठकीत सत्ताधारी सर्व विरोधी पक्षांचे ऐक्य दिसेल, अशी शक्यता व्यक्त केली जात होती, मात्र या बैठकीला काही प्रमुख पक्षांनी दांडी मारल्याने इंडिया आघाडीतील बिघाडी कायम आहे की काय अशी चर्चा सुरू झाली आहे.




दिल्लीत काँग्रेसच्या नेतृत्वात झालेल्या इंडिया आघाडीच्या बैठकीला पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी यांनी उपस्थिती लावली. एरवी त्या इंडिया आघाडीच्या बैठका टाळत असत, पण दारूण पराभवानंतर त्यांनी मिळतेजुळते घेण्याचे ठरवलेले दिसते. सोबतच समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव, नॅशनल कॉन्फ्रन्सचे ओमर अब्दुल्ला, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या सुप्रिया सुळे यांच्यासह विरोधी पक्षांचे इतर नेते उपस्थित होते.

तामिळनाडूमधील पराभवानंतर काँग्रेसने साथ सोडलेला डीएमके, काँग्रेसने तामिळनाडूत आघाडी केलेला टीव्हीके, अरविंद केजरीवाल यांचा आम आदमी पक्ष, झारखंडमधील झारखंड मुक्ती मोर्चा या पक्षांच्या नेत्यांनी मात्र इंडिया आघाडीच्या या महत्त्वाच्या बैठकीकडे पाठ फिरवली. त्यामुळे बऱ्याच दिवसांनंतर झालेल्या या बैठकीनंतरही इंडिया आघाडीत सारेकाही आलबेल नसल्याचे चित्र दिसून आले आहे.

भावपूर्ण श्रद्धांजली
जगी ऐसा बाप व्हावा । ज्याचा वंश मुक्तीस जावा ।।



स्व. कान्हाशेठ हरी ठाकूर

बुधवार दि. ०३/०६/२०२६ रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७४ व्या वर्षी श्री माऊली चरणी विलीन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरंतर शांती लाभो हिच माऊली चरणी प्रार्थना!
तुका म्हणे पावठणी । करू स्वर्गाची निशाणी ।।

| वार | दिनांक | भजन मंडळाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|
| मंगळवार | ०९/०६/२०२६ | जय मल्हार प्रासादिक भजन मंडळ - तरघर<br>बुवा- श्री. रूपेश मढवी, श्री. सिद्धेश पाटील,<br>पखवाज - सागर मढवी, किरण ओवळेकर | सायं. ७ ते ८.३० वा. |
| बुधवार | १०/०६/२०२६ | श्री. दत्त प्रासादिक भजन मंडळ - कोपर<br>बुवा - ह.भ.प. वसंतशेठ पाटील, पखवाज - वैष्णव देशमुख | सायं. ७ ते ८.३० वा. |
| गुरूवार | ११/०६/२०२६ | श्री. नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ - कोपरा<br>गायिका - सौ. शिवमाला पाटील, पखवाज- निलेश पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| शुक्रवार | १२/०६/२०२६ | दत्त प्रासादिक भजन मंडळ - आदई<br>बुवा - श्री. गणपत म्हात्रे, पखवाज - चेतन पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| शनिवार | १३/०६/२०२६ | नादब्रम्ह साधना मंडळ - खारघर<br>गुरूवर्य श्री.निवृत्ती बुवा चौधरी, पखवाज - निलेश पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |

| वार | दिनांक | भजन मंडळाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|
| रविवार | १४/०६/२०२६ | हनुमान प्रासादिक भजन मंडळ - पडघे<br>संगीत रत्न श्री. शंकुनाथ बुवा पडघेकर,<br>पखवाज - किशोर पाटील, चालक - पांडुशेठ भोईर | सायं. ७ ते ८.३० वा. |

सोमवार | १५/०६/२०२६

हरि किर्तन



सकाळी -१०:०० ते १२:००
किर्तनकार -ह.भ.प. वैभव बुवा मंडलिक,
पखवाज साथ - श्री. सुधीर भाऊ कराळे,
तबला साथ - श्री. दिगंबर गायकर,
सहगायक -श्री. अनिल यशवंतराव,
श्री हर्षल घुढे,
सिंथेसाईझर - श्री. दर्शन वाघचौडे



* किर्तनकार *
ह.भ.प. वैभव बुवा मंडलिक

शोकाकुल - समस्त ठाकूर परिवार

टिप - कोणत्याही प्रकारचे दुःखवटे स्वीकारले जाणार नाहीत.

# रायगडातील ‘महावितरण’ची अपूर्ण कामे मान्सूनपूर्वी गतीने पूर्ण करावीत -मंत्री बोर्डीकर

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील महावितरणची अपूर्ण असणारी सर्व कामे मान्सून सुरू होण्याअगोदर गतीने पूर्ण करावीत. अलिबाग तालुक्यातील आवास ते रेवदंडा परिसरात ग्राहकांची वाढती संख्या लक्षात घेऊन महावितरणच्यावतीने लवकरात लवकर शिबिराचे आयोजन करून ग्राहकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यात यावे. तसेच या परिसरातील वाढत्या वीजची मागणी लक्षात घेता १०० केव्हीचे २५ ट्रान्सफॉर्मर देण्यात यावेत, असे निर्देश ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी दिले.



एमएसईबी होल्डिंग कंपनीच्या कार्यालयात आवास ते रेवदंडा किनारपट्टी परिसरातील वीजेच्या वाढत्या मागणीसंदर्भात आयोजित बैठकीत राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर बोलत होत्या. यावेळी पेण मंडळाचे अधीक्षक अभियंता धनराज बिक्कड, अलिबाग मंडळाचे कार्यकारी अभियंता राजेश भगत, अतिरिक्त कार्यकारी अभियंता आकाश तायडे, कार्यकारी अभियंता अविनाश पगारे, सतीश धारप, वैकुंठ पाटील, संकेत जोशी, उदय काठे आदी मान्यवर उपस्थित होते.

ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर म्हणाल्या, अलिबाग तालुक्यातील आवास ते रेवदंडा या किनारपट्टीच्या गावामध्ये सागरी पर्यटन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे स्थानिक नागरिकांनी घराघरात छोटे कॉटेज, होम-स्टे व इतर पर्यटनपूरक सुविधा निर्माण केल्या आहेत. या परिसरात वाढलेल्या पर्यटन व्यवसायामुळे विजेची मागणी लक्षात घेता महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी तातडीने येथील विजेचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत. याचबरोबर या परिसरात शिबिराचे आयोजन करून ग्राहकांच्या तक्रारीचे निराकरण करावे.

# सापडलेले पाकिट केले परत

## आमदार महेंद्र दळवी यांच्याकडून कौतुक

**मुरुड : प्रतिनिधी**

रस्त्यावर सापडलेला पैशांनी व महत्त्वाच्या कागदपत्रांनी भरलेले पॉकीट प्रामाणिकपणे मालक - आबीद उलडे यांना परत करून अमिर शेख यांनी समाजापुढे आदर्श निर्माण केला. या उल्लेखनीय कृतीबद्दल स्थानिक आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी मुरुड पोलिस ठाण्यात येऊन त्यांचे कौतुक करत त्याच्या प्रामाणिकपणाचा गौरव केला.



अलिबाग येथील रहिवासी अबीद उलडे हे आपल्या चारचाकी वाहनातुन शनीवार दिनांक ६ जुन २०२६ रोजी सायंकाळच्या दरम्यान मुरूड शिघ्रे नविवाडी आपल्या मित्रांना भेटण्यासाठी गेले त्यानंतर काही अंतरावर जंगल भागात असणाऱ्या फार्म हाऊसवर गेले असता त्याठिकाणी गाडी उभी करुन उतरुन पायी जात असताना खिशातुन पॉकीट रस्त्यात कधी पडला हे कळचं नाही. आज तीन दिवसांनी शिघ्रे येथे राहणारे अमिर शेख यांना त्या जंगल भागात जात चालत जात असताना रस्त्याच्या साईट पट्ट्याच्या साधारण माती खाली रोख रक्कम व महत्वाचे कागदपत्रे व पेन्ड्राऊ असलेला पॉकीट आढळुन आले .पॉकीट मिळाल्यानंतर त्याने तत्काळ मालकाला फोन लावुन माहिती दिली. आणि कोणत्याही अपेक्षेशिवाय तो सुरक्षितपणे परत केले पॉकीट परत मिळाल्याने मालकाने आनंद व्यक्त करत अमिर शेख यांचे आभार मानले .

# मान्सून पूर्वतयारी आणि आपत्ती व्यवस्थापन कामाचा महापौरांनी घेतला आढावा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी पावसाळयाच्या पार्श्वभूमीवर संभाव्य आपत्कालीन परिस्थिती टाळण्यासाठी महापालिका, पोलिस प्रशासन, महसूल प्रशासन या तीन प्रमुख विभागा बरोबरच सर्व संबधित विभागांमध्ये समन्वय असणे गरजेचे असल्याचे महापौर नितीन पाटील यांनी सांगितले.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेकडून व्यापक नियोजन करण्यात आले आहे. यासंदर्भात आयोजित नियोजन बैठक आज (८जून) महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहातील बैठक कक्षात घेण्यात आली. यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार,स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, महापालिका सदस्य, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त स्वरूप खारगे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त अभिषेक पराडकर, उपायुक्त मंगला माळवे, वरिष्ठ पोलिस परिक्षक नितीन ठाकरे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी सुबोध ठाणेकर, डॉ. रूपाली माने, पोलिस विभागाचे अधिकारी, पालिका अधिकारी, सिडको अधिकारी, सीआरपीएफ प्रतिनिधी, उपस्थित होते.

यावेळी महापौरांनी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर चारही प्रभागातील मॅन होलची तपासणी करून दुरूस्तीकडे प्राधान्याने लक्ष द्यावे, आपत्कालीन व्यवस्थापनाच्या दृष्टीने विविध विभागातील अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, वॉकीटॉकीचा प्रभावी वापर तसेच आपत्कालीन कामकाजाचे प्रशिक्षण सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना द्यावे अशा सूचना दिल्या.



महापालिकेची मान्सुनपूर्व व आपत्कालीन परिस्थितीसाठी महापालिकेने केलेल्या तयारीची माहिती परिवहन विभागाचे व्यवस्थापक कैलास गावडे यांनी दिली. पोलिस प्रशासनाच्या तयारीबाबत सांगताना वरिष्ठ पोलिस परिक्षक नितीन ठकारे यांनी आपत्कालीन मदतीसाठी जॅकटेस, बोटी, आपत्कालीन मदतीसाठी पथके सज्ज असल्याचे सांगितले. कोळी बांधवाचे नेटवर्क तसेच ११२ क्रमांकाच्या साहाय्याने तात्काळ मदत दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले तसेच सिडको प्रशासनाने होर्डिंग्जचे स्ट्रक्चरल ऑडीट, आपत्कालीन ऑपरेशन सेंटर, तसेच इतर अनुषंगिक कामे सुरू असल्याची माहिती दिली. वीजेच्या तारांमधील येणाऱ्या झाडांच्या फांद्याची छाटणी, आवश्यक ठिकाणी केबल अंडर ग्राऊंड करणे, तक्रारींचे निवारण करण्यासाठी २४ तास सेवा सुरू असल्याचे वीज वितरण विभागाच्या वतीने सांगितले.

वृक्ष प्राधिकरण विभागाच्या वतीने उपायुक्त स्वरूप खारगे यांनी आतापर्यंत सुमारे साडेतीन हजार धोकादायक झाडांच्या छाटणीचे काम पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्यात आल्याचे सांगितले. नाले सफाईची कामे वेगाने सुरू असून यासाठी नाले सफाईसाठी २३ जेसीबी, १५ पोखलँड, ७५० मनुष्यबळ, २२ हायवा व इतर मशिनरी द्वारे काम सुरू असल्याचे सांगितले. नाले सफाईची कामे अंतिम टप्पयात असून याबरोबर पनवेल व कामोठेमध्ये ४० पंप, कळंबोली व खारघर प्रभागात १९ पंप बसविण्यात आल्याचे उपायुक्तांन डॉ. वैभव विधाते यांनी सांगितले.

पूरपरिस्थिती हातळण्यासाठी ४० अग्निशामकांना प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती अग्निशमन विभागाच्या मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके यांनी दिली. तसेच पावसाळ्यांच्या पार्श्वभूमीवर २४x७ टिम व सर्व आवश्यक वाहने, बोटी सज्ज असल्याचे त्यांनी सांगितले. एनडीआरएफच्या वतीने आपत्कालीन परिस्थितीत मदत करण्यासाठी ४ रेस्क्यू टिम असल्याची माहिती दिली. सर्व आवश्यक अत्याधुनिक मशिनरी मदतीसाठी उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवरती साथरोगासारखे विकार उद्‌भवल्यास तयारीच्या दृष्टीने औषधसाठा व इतर वैद्यकिय सेवासुविधांची सोय करण्यात आली असून सर्व २६ आरोग्य केंद्रामध्ये रॅपिड रिस्पॉन्स टिम उपलब्ध असून, पालिका क्षेत्रातील सर्व खाजगी रूग्णालयांना देखील आपत्कालीन व्यवस्थापन कायद्यानुसार सेवा देणेबाबत निर्देश देण्यात आल्याची माहिती मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी दिली.

महसूल विभागाकडून देखील आपत्कालीन परिस्थितीला तोंड देण्यासाठी सर्व मान्सुनपूर्व तयारी झाल्याची माहिती नायब तहसीलदारांनी दिली. या बैठकीस उपस्थित सर्व महापालिका पदाधिकारी, सदस्य व विविध विभागांतील अधिकाऱ्यांचे आभार मानून बैठकिचा समारोप उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केला.

# जीवन प्राधिकरण नळ योजनेच्या खोदकामामुळे शेतकऱ्यांची अडचण; तळवली ग्रामस्थांचे निवेदन

**खोपोली : प्रतिनिधी**

तळवली गावातील जीवन प्राधिकरण नळ योजनेच्या कामामुळे शेतकऱ्यांसमोर मोठी समस्या निर्माण झाली आहे. गावाबाहेरील शेतजमिनींकडे जाणारा रस्ता सुमारे दोन महिन्यांपूर्वी खोदण्यात आला असून अद्याप त्या ठिकाणी पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झालेले नाही.परिणामी शेतकऱ्यांना आपल्या शेतापर्यंत पोहोचणे कठीण झाले असून शेतीच्या हंगामात त्यांची चिंता वाढली आहे.

सध्या जून महिना सुरू असून पावसाळी पेरणीची तयारी शेतकरी करत आहेत, मात्र रस्ता खोदून ठेवण्यात आल्याने बैलजोडी, नांगर तसेच इतर यांत्रिक शेती अवजारे शेतापर्यंत नेणे शक्य होत नसल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. त्यामुळे शेतीची कामे रखडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. या संदर्भात तळवली येथील ग्रामस्थांनी एकत्र येत ग्रुप ग्रामपंचायत वडगाव यांना लेखी निवेदन सादर केले आहे. निवेदनात खोदकाम केलेल्या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करावी अथवा पाईपलाईनचे काम पूर्ण करून शेतकऱ्यांना मार्ग मोकळा करून द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.



ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार ही योजना महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येत असली तरी तिच्या संथ कामकाजाचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. खोदकाम करून अनेक दिवस उलटून गेले असतानाही संबंधित कंत्राटदाराने पुढील काम सुरू केले नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. रस्ता खोदून ठेवल्यानंतर कंत्राटदार त्या ठिकाणी फिरकलाच नसल्याचेही शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

सदर नळ योजना २०२३-२४ या कालावधीत मंजूर झाली होती. मात्र प्रत्यक्ष कामाला २०२६मध्ये गती मिळाल्याचे सांगितले या खोदलेल्या रस्त्यामुळे "आम्ही शेतीची लागवड करायची की नाही?" असा संतप्त सवालही शेतकरी उपस्थित करत आहेत.

**तळवली गावात जीवन प्राधिकरणाच्या नळ योजनेसाठी करण्यात आलेले खोदकाम अपूर्ण अवस्थेत असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे. पावसाळा जवळ आल्याने शेतीसाठी लागणारी यांत्रिक अवजारे तसेच बैलजोडी शेतापर्यंत पोहोचण्यात अडचणी निर्माण झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत संबंधित कंत्राटदाराला दोन दिवसांत खोदलेला रस्ता भराव करून शेतकऱ्यांसाठी मार्ग मोकळा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. अन्यथा ग्रामपंचायत प्रशासन स्वतः जेसीबीच्या साहाय्याने भराव करून मार्ग खुला करेल,**

**- विनोद चांदोरकर,**

प्रशासक, खालापूर

आयुष्मान भारत डिजिटल मिशन

# पनवेल येथे आज रायगड मॉडेल जिल्हा कार्यशाळेचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र शासनाच्या राष्टीय आरोग्य प्राधिकरणाच्या निर्देशानुसार राज्यात आयुष्मान भारत डिजिटल मिशन राबविण्यात येत आहे. आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंतर्गत रायगड जिल्ह्याची ‘मॉडेल जिल्हा’ म्हणून निवड करण्यात आली असून, या उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मंगळवार, दि.०९ जून, रोजी सकाळी ९.३० वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके सभागृह, पनवेल येथे रायगड मॉडेल जिल्हा उद्‌घाटन कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरण, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तसेच आरोग्यमंत्री मा. प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके सभागृह, पनवेल येथे ही कार्यशाळा संपन्न होणार आहे.

डिजिटल आरोग्य सेवांचा विस्तार, आरोग्य व्यवस्थेचे डिजिटायझेशन आणि नागरिकांना अधिक सुलभ, पारदर्शक व परिणामकारक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने रायगड जिल्ह्यात हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबविण्यात येत आहे. मॉडेल जिल्हा उपक्रमांतर्गत जिल्ह्यात ३८३ शासकीय आरोग्य संस्था असून, त्यांपैकी सर्व संस्थांमध्ये ABDM-संलग्न HMIS कार्यान्वित आहे. तसेच, खासगी आरोग्य संस्थांमध्ये ABDM-संलग्न HMIS सुरू करण्यासाठी प्रोत्साहन देऊन त्यांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्यामध्ये आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंतर्गत ७.१२ कोटी नागरिकांचे आभा आयडी तयार झाले असून, ९६,२१० आरोग्य व्यावसायिकांची नोंदणी झाली आहे. तसेच, ३४,९६४ आरोग्य संस्थांची नोंदणी करण्यात आली आहे. राज्यामध्ये १० जिल्ह्यांमध्ये Microsite Project राबविण्यात आला असून, त्यामध्ये खासगी क्षेत्रातील आरोग्य व्यावसायिकांची नोंदणी करून त्यांचा सहभाग वाढविण्यास सुरुवात करण्यात आली आहे.

राज्यातील १०,६०७ संस्थांमध्ये Health Record Linkage चे काम सुरू असून, आतापर्यंत २.३८ कोटी आरोग्य नोंदी (Health Records) लिंक करण्यात आल्या आहेत. या कार्यशाळेस आरोग्य विभागाचे राज्यस्तरीय प्रमुख अधिकारी, ठाणे परिमंडलातील सर्व महत्त्वाचे आरोग्य अधिकारी, शासकीय वैद्यकीय अधिकारी, खासगी वैद्यकीय व्यावसायिक, इंडियन मेडिकल असोसिएशनचे पदाधिकारी तसेच आरोग्य क्षेत्राशी संबंधित विविध घटक असे सुमारे ६५० प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

कार्यशाळेत आयुष्मान भारत डिजिटल मिशनची उद्दिष्टे, डिजिटल आरोग्य नोंदींची अंमलबजावणी, आभा आयडी निर्मिती, हेल्थ फॅसिलिटी रजिस्ट्री आणि हेल्थकेअर प्रोफेशनल रजिस्ट्री यांसह विविध विषयांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व खासगी वैद्यकीय व्यावसायिक तसेच इंडियन मेडिकल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी या कार्यशाळेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

रायगड जिल्ह्याची मॉडेल जिल्हा म्हणून झालेली निवड ही राज्यातील डिजिटल आरोग्य क्षेत्रासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल मानली जात असून, या उपक्रमातून विकसित होणाऱ्या सर्वोत्तम कार्यपद्धती भविष्यात राज्यातील इतर जिल्ह्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहेत. सदर कार्यक्रमासाठी केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, संचालक तसेच त्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. तसेच राज्यस्तरावरून प्रधान सचिव-१, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई; सचिव-२, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई; आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई; आयुक्त (शहरी आरोग्य), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई; आयुक्त, राज्य कर्मचारी विमा सोसायटी, मुंबई; मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई; मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरण, मुंबई; संचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई; संचालक (प्राथमिक), यांच्या उपस्थितीत कार्यशाळा संपन्न होणार आहे.

### महापालिकेची दखल

डिजिटल हेल्थ आयडी निमिती, ई हॉस्पीटल सिस्टिम्स, ओपीडी डेटा डिजीटल करणे, नागरिकांचे इलेक्ट्रॉनिक हेल्थ रेकॉर्डस तयार करणे यामध्ये पनवेल महानगरपालिकेने राज्यात प्रथम क्रमांक घेऊन आघाडी घेतली आहे. महानगरपालिकेच्या या कामाची दखल घेत शासनाने ‘रायगड मॉडेल जिल्हा’ कार्यशाळेचे आयोजन करण्याचा सन्मान पालिकेस दिला आहे.

# सुधागडात महावितरणच्या अभियंत्याला जीवे मारण्याची धमकी, पितापुत्राविरुद्ध गुन्हा

**पाली : प्रतिनिधी**

स्मार्ट मीटर बसवल्याच्या कारणावरून महावितरणच्या अधिकाऱ्याला रस्त्यात अडवून, त्यांच्या शर्टाची कॉलर पकडून 'हात-पाय तोडण्याची' आणि 'जिवे मारण्याची' धमकी दिल्याचा धक्कादायक प्रकार सुधागड तालुक्यात उघडकीस आला आहे. याप्रकरणी महावितरणचे उपकार्यकारी अभियंता बालाजी प्रल्हादराव चात्रे यांच्या तक्रारीवरून पाली पोलिसांनी पेडली येथील राम मारुती पवार आणि दिनेश राम पवार या पिता-पुत्रांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, केंद्र शासनाच्या आर.डी.एस.एस. योजनेअंतर्गत महावितरण कंपनीतर्फे ग्राहकांचे जुने मीटर बदलून त्या ठिकाणी नवीन स्मार्ट मीटर बसवण्याचे काम सुरू आहे. बुधवार, दिनांक २७ मे २०२६ रोजी दुपारी उपकार्यकारी अभियंता बालाजी चात्रे हे आपल्या सहकाऱ्यांसह पेडली भागात आढावा घेण्यासाठी गेले होते. पेडली गावातील ग्राहक राम मारुती पवार यांनी नोटीस देऊनही जुने मीटर बदलू दिले नसल्याचे लाईनमनने अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यानंतर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नियमाप्रमाणे जुने मीटर बदलून त्या जागी नवीन स्मार्ट मीटर बसवण्यात आले. मीटर बदलल्याचा राग मनात धरून राम पवार आणि त्यांचा मुलगा दिनेश पवार यांनी सायंकाळी ६:४५ वाजताच्या सुमारास भालगुल फाटा येथे शासकीय वाहनाने जाणाऱ्या अधिकाऱ्यांना अडवले. "आमचा जुना मीटर आत्ताच्या आत्ता परत लावा," असे म्हणत राम पवार यांनी थेट उपकार्यकारी अभियंता चात्रे यांच्या शर्टाची कॉलर पकडली आणि त्यांना धमकी दिली. एवढ्यावरच न थांबता दोघांनी चात्रे यांना पकडून जबरदस्तीने त्यांच्या चारचाकी गाडीकडे ओढत नेण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर पेडली मुख्य रस्त्यावरील जैन मंदिरासमोर शासकीय वाहन थांबवून चात्रे यांची कॉलर पकडली आणि पॅन्टचे बक्कल खेचले. जुने मीटर परत नाही बसविले तर तंगड्या तोडेन, तुला जिवे ठार मारेन, अशी धमकी दिली.

या गंभीर प्रकारानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार लाईनमनने वाद मिटवण्यासाठी जुने आणि नवीन दोन्ही मीटर सिरीजमध्ये लावण्याचा प्रयत्न केला. मात्र, पिता-पुत्रांनी नवीन सिरीज मीटर लावण्यासही तीव्र विरोध केला. महावितरणचे अधिकारी व कर्मचारी आपले कर्तव्य बजावत असताना धाक दाखवून, बलप्रयोग करत शासकीय कामात मोठा अडथळा निर्माण केला.

याप्रकरणी उपकार्यकारी अभियंता बालाजी चात्रे यांनी पाली पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार नोंदवली आहे. पोलिसांनी पितापुत्रविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक (SI) सचिन माधवराव निकम करत आहेत.

याबाबत संबंधित पितापुत्रांनी पोलीस स्थानकात वीज महावितरण अधिकाऱ्यांच्या विरोधात देखील तक्रारी अर्ज केला आहे. यामध्ये वीज महावितरणच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांनी घरात कोणीही नसताना वीज मीटर बदलले असल्याचे नमूद केले आहे. तसेच वीज महावितरणच्या अधिकाऱ्यांनी जातीवाचक शिव्या दिल्याचे म्हटले आहे. व ॲट्रॉसिटी दाखल करण्याची मागणी केली आहे.

# पळून गेलेल्या आरोपीला पुन्हा अटक

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

शौचालयाचा बहाणा करून शौचालयाच्या खिडकीतून पळून गेलेल्या आरोपीला कामोठे पोलिसांनी काही तासातच अटक केली. चेतन कातकर असे या आरोपीचे नाव आहे.

चेतन चंद्रकांत कातकर याला कामोठे पोलिसांनी एका गुन्ह्यात अटक केली होती. ७ जून रोजी पोलीस तपासा दरम्यान आरोपीने शौचालयात जाण्याचा बहाणा केला आणि सव्वाचारच्या सुमारास कामोठे पोलीस ठाण्याच्या शौचालयाच्या खिडकीतून तो पळून गेला.

पोलिसांच्या हा प्रकार लक्षात आल्या नंतर कामोठे पोलिसांनी त्याचा ठिकठिकाणी शोध घेतला. आणि काही तासातच त्याला ताब्यात घेऊन त्याच्या विरोधात आठ जून रोजी पळून जाण्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# कामोठ्यातील बत्ती गुलची महावितरणकडून दखल

## नवीन पाच एमव्हीए क्षमतेचे रोहित्र तातडीने बसवणार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कामोठेसह पनवेल परिसरातील विविध भागांमध्ये सातत्याने होत असलेल्या वीजपुरवठा खंडित होण्याच्या गंभीर समस्येमुळे भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि.७) थेट भिंगारी येथील महावितरण कार्यालयात धडक देत अधिकाऱ्यांना जाब विचारुन वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली होती. याची महावितरण प्रशासनाला अखेर दखल घ्यावी लागली. सोमवारी सकाळी महावितरणचे कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर यांनी सेक्टर ९ येथील उपकेंद्राला भेट देत वीज व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. या वेळी स्थानिक अधिकाऱ्यांना जाब विचारत तातडीच्या उपाययोजनांचे निर्देश देण्यात आले.

सोमवारी सकाळी कार्यकारी संचालक धनंजय औंढेकर यांनी उपकेंद्राला भेट देऊन सध्याची वीज मागणी, वीजपुरवठा किती वेळा खंडित झाला, त्यामागील कारणे, तसेच वीज खंडित झाल्यानंतर प्रत्यक्षात कोणती कार्यवाही करण्यात आली याची सविस्तर माहिती घेतली. मुख्य अभियंता संजय पाटील हेही यावेळी उपस्थित होते.



वीज समस्येवर उपलब्ध पर्यायांची माहिती घेतल्यानंतर, हे पर्याय माहिती असूनही त्यासाठी वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा का करण्यात आला नाही, असा सवाल औंढेकर यांनी अभियंत्यांना केला. यापूर्वी कोणता पत्रव्यवहार झाला, कोणत्या अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव पाठविण्यात आले, याचीही माहिती मागविण्यात आली.

प्रश्नोत्तरांनंतर वारंवार वीज खंडित होऊ नये यासाठी नियोजन बैठक घेण्यात आली. उपकेंद्रातील रिकाम्या जागेवर अधिक क्षमतेचा रोहित्र बसवून त्यासाठी आवश्यक वीजवाहिनी व जोडण्या उपलब्ध करण्याचा निर्णय घेण्यात आला. मे आणि जून महिन्यातील वीजखंडितीचाही आढावा घेण्यात आला.पाऊस आणखी पंधरा दिवस लांबण्याची शक्यता असल्याने कामोठ्यातील वीज मागणी वाढतच राहणार आहे. त्यामुळे पुढील १५ दिवस नागरिकांना 'बत्तीगुल'चा सामना करावा लागू नये यासाठी तातडीच्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत.

सेक्टर ९ येथील उपकेंद्रात सध्या १० एमव्हीए क्षमतेचे तीन, म्हणजे एकूण ३० एमव्हीए क्षमतेचे रोहित्र आहेत. त्यामध्ये वाढ करून आणखी ५ एमव्हीए क्षमतेचा रोहित्र तातडीने बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी लागणारा खर्च, जागेची पाहणी आणि आवश्यक साहित्याची जुळवाजुळव याच बैठकीत करण्यात आली. खांदेश्वर येथील महागृहनिर्माण प्रकल्पातील नव्या उपकेंद्रातून एक वीजजोडणी येथे उपलब्ध झाली आहे. सिडकोने अद्याप या प्रकल्पातील घरांचा ताबा दिलेला नसल्याने त्या इनकमरवरील वीजप्रवाहावर ५ एमव्हीएचा रोहित्र सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

**अधिकाऱ्यांनी कार्यकारी संचालकांना कळवलेच नाही**

औंढेकर यांनी कामोठ्यातील अधिकाऱ्यांना फैलावर घेताना एक महत्त्वाची बाब समोर आली. त्यांचे वाहनचालक दररोज कामोठ्यात येत असल्याने वीजखंडिती नंतर संतप्त नागरिकांकडून उपकेंद्राबाहेर होत असलेला रोष त्यांनी प्रत्यक्ष पाहिला होता. शनिवारी घडलेला प्रकारही वाहनचालकाने औंढेकर यांच्या निदर्शनास आणून दिला. मात्र मुख्य अभियंत्यांपासून इतर कोणत्याही स्थानिक अधिकाऱ्यांनी ही गंभीर परिस्थिती वरिष्ठांच्या कानावर घातली नसल्याने औंढेकर यांनी संताप व्यक्त केला.

# कॅन्सरग्रस्त रुग्णांच्या सेवेबद्दल जोशी दाम्पत्याचा इस्कॉनतर्फे सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजसेवा आणि मानवतेच्या कार्यात सातत्याने योगदान देणाऱ्या शुभम सामाजिक सेवाभावी संस्था, खारघरचे संस्थापक प्रभाकर जोशी आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सुजाता जोशी यांचा इस्कॉन खारघर मंदिराच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला.

खारघर येथील इस्कॉन मंदिरात कर्करोगग्रस्त रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या सर्वांगीण कल्याणासाठी सुरू करण्यात आलेल्या 'होलिस्टिक कॅन्सर हीलिंग रिट्रीट' आणि 'कृष्णा संजीवनी द डिव्हाईन म्युझिक' या उपक्रमांतर्गत नुकताच झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल जिष्णू देव वर्मा, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, इस्कॉन नवी मुंबईचे मंदिर अध्यक्ष डॉ. सूर दास, भक्तिवेदांत कॉलेजचे संचालक डॉ. व्ही.सेवक दास, कॅल्विन सेउंगवॉन यी, जिल्हाधिकारी किशन जावळे, आयुक्त मंगेश चितळे, डॉ. विक्रम गोटा, डॉ. अमित जोशी, डॉ. रजनीश कामत, डॉ. अविनाश टिप्पणी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात जोशी दाम्पत्याचा सत्कार करण्यात आला.

प्रभाकर जोशी आणि सुजाता जोशी हे दाम्पत्य गेल्या अनेक वर्षांपासून शुभम सामाजिक सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून कॅन्सरग्रस्त रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करत आहे. रुग्णांना उपचार प्रक्रियेसाठी आवश्यक मार्गदर्शन, टाटा कॅंसर मेमोरिअल हॉस्पिटल येथे फाईल तयार करून देणे, विविध शासकीय व सामाजिक योजनांची माहिती उपलब्ध करून देणे तसेच रुग्णांच्या नातेवाईकांच्या राहण्याची व्यवस्था करण्यासाठी मदत करणे अशी अनेक समाजोपयोगी कामे संस्थेमार्फत केली जातात.याशिवाय ग्रामीण भागातील विविध समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न, गरजू युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणे यामुळे संस्थेने समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे. जोशी दाम्पत्याच्या या उल्लेखनीय सेवाकार्याची दखल घेत खारघर इस्कॉन मंदिराच्या विश्वस्त मंडळाने त्यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचे कौतुक करत समाजसेवेची ही प्रेरणादायी वाटचाल भविष्यातही अशीच सुरू राहो, अशा शुभेच्छा व्यक्त केल्या.

# २०११पूर्वीची निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**नवीन पनवेल :रामप्रहर वृत्त**

राज्यातील गरीब व गरजू कुटुंबांच्या निवासस्थानाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाने २५ मार्च २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून १ जानेवारी २०११ पूर्वीची व सध्या अस्तित्वात असलेली निवासी अतिक्रमणे नियमित करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र नागरिकांनी तात्काळ अर्ज दाखल करावेत, असे आवाहन पनवेलचे अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे-पाटील यांनी केले आहे.

महसूल व वन विभागाच्या शासन निर्णयानुसार बृहन्मुंबई वगळता राज्यातील इतर जिल्ह्यांमध्ये १ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वी झालेली व केवळ निवासी कारणासाठी वापरात असलेली अतिक्रमणे विशिष्ट अटी व शर्तींनुसार नियमित करण्यात येणार आहेत. यासाठी नागरिकांनी संबंधित ग्रामपंचायत अधिकारी अथवा ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावयाचे आहेत. अर्जासोबत मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कराची पावती, ग्रामपंचायतीचा ८-अ उतारा, अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवही, उपग्रह छायाचित्र तसेच मागील एका वर्षातील रहिवासाचा शासकीय पुरावा जोडणे आवश्यक राहणार आहे. शासनाने अर्ज सादर करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत मुदत दिली असून, या कालावधीत अर्ज करणाऱ्या पात्र व्यक्तींना त्यांचे अतिक्रमण नियमित होईपर्यंत संरक्षण मिळणार आहे.

शासन निर्णयानुसार ५०० चौरस फूट क्षेत्रापर्यंतची निवासी अतिक्रमणे पूर्णपणे विनामूल्य नियमित करण्यात येणार आहेत. ५०० ते १५०० चौरस फूट क्षेत्रापर्यंतच्या अतिक्रमणांमध्ये पहिल्या ५०० चौरस फूट क्षेत्रासाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. त्यापुढील क्षेत्रासाठी प्रचलित बाजारमूल्याच्या १० टक्के रक्कम आकारण्यात येईल. निवासी जागेचा काही भाग व्यावसायिक वापरात असल्यास संबंधित क्षेत्रासाठी बाजारमूल्याच्या २५ टक्के रक्कम आकारली जाणार आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र नागरिकांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता आवश्यक कागदपत्रांसह अर्ज दाखल करावेत, असे आवाहन अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे- पाटील यांनी केले आहे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात मियावाकी आणि कोकेडेमा कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात दि. ५ जून या दिवशी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पर्यावरणपूरक विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यात मियावाकी व कोकेडेमा यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

'कोकेडेमा' या कार्यशाळेसाठी अंकुर सामाजिक संस्थेस बोलविण्यात आले होते. त्यांनी वनस्पतीची 'कोकेडेमा' पध्दतीने आकर्षक व पर्यावरणपूरक मांडणी कशी करावी याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. मियावाकी या



कार्यशाळेमध्ये मियावाकी पध्दत वापरुन कमी जागेत अतिशय घनदाट आणि स्थानिक प्रजातीचे वृक्ष लावून जंगल तयार केले जाते याबद्दल माहिती सकिना गाडीवाला यांनी दिली.

त्याच बरोबर जागतिक पर्यावरण दिनानिमित्त प्राचार्य, शिक्षक व सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी 'पर्यावरण प्रतिज्ञा' घेतली आणि सर्वांनी वृक्षारोपण केले. शिक्षकांमध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जागरुकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. कोकेडेमा या कार्यशाळेत सर्व शिक्षकांनी उत्साहाने सहभाग घेतला.

# केडीऐजीबी ग्रुप आणि ओरायन मॉलच्या रक्तदान शिबिराला प्रतिसाद; २०५ नागरिकांनी केले रक्तदान

**पनवेल : वार्ताहर**

ओरायन मॉल पनवेल येथे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. याचे ऊद्धाटन डॉक्टर निलेश बांठिया यांच्या हस्ते पार पडले. ऊद्धाटन प्रसंगी जेष्ठ डॉक्टर गिरीश गुणे आणि डॉक्टर ययाती गांधी उपस्थित होते. प्रसिद्ध ऊद्योगपती व केडिऐजीबी संस्थे चे अध्यक्ष मंगेश परुळेकर आणि उपाअध्यक्ष राजश्री नाईक यांनी सर्व मांन्यवरांचे स्वागत केले.

या प्रसंगी रक्तदान शिबीराचे सहयोगी आय.डब्लुसी ग्यालेक्सी न्यु पनवेल चे प्रेसिडेंट भुमिका परमार व सेक्रेटरी दिपा आडमुठे या उपस्थित होत्या. डॉक्टर निलेश बांठिया यांनी स्वता रक्तदान करुन



शिबीराचा शुभारंभ केला. या प्रसंगी बोलतांना डॉक्टर निलेश बांठिया यांनी रक्ताचा तुटवडा असतांना रक्तदान शिबीर आयोजित केल्या बद्दल आयोजकांना धंन्यवाद दिले आणि जास्तीत जास्त लोकांनी या शिबारात रक्तदान करावे असे आहवान केले.

डॉक्टर गिरीश गुणे यांनी ओरायन मॉल चे हे रक्तदान शिबीराचे तिसरे वर्ष आहे, एप्रिल, मे ला दर वर्षी रक्तदान शिबीरांचे आयोजन तुरळक प्रमाणात असल्या मुळे या महिन्यात रक्ताचा तुटवडा असतो, या वर्षी आयोजकांनी २०० युनीट रक्त संकलनाचे टारगेट ठेवले आहे त्याना शुभेच्छा देऊन लोकांनीही रक्तदान करावे असे अवाहन केले.

एम.जी.एम हॉस्पिटल कामोठे रक्तपेढी चे प्रमुख राजेश अत्तरडे यांनी तुमच्या या आजच्या रक्तदान शिबीराला महत्व फार आहे कारण रक्ताच्या तुटवड्या मुळे आमच्या हॉस्पिटल मधे थ्यालासिमीया ची २२० मुले, हृदय शस्त्रक्रीया चे पेशंट रक्ता च्या वेटींग मधे आहेत,आजच्या रक्तदान शिबीरा मुळे गरजुं गरीबांना रक्त उपलब्ध होणार आहे, त्या बद्दल तुम्हाला धंन्यवाद द्यावे तेवढे कमीच आहेत, असे सांगीतले.

पनवेलमधील व्यवसायिक प्रशांत पोद्दार व संजय पोद्दार तसेच मुंबई हुन गौडब्राम्हण संस्थे चे महेश रहाळकर, सिंधुदुर्ग मंडळ चे अध्यक्ष केशव राणे , प्रल्हाद साटम. ऍड नागेश हिरवे यांनी उपस्थित राहुन रक्तदान केले. रक्तदान शिबीरा मध्ये २६० रक्तदात्यांनी भाग धेतला तरी प्रत्यक्ष २०५ रक्तदात्यांना रक्तदान करता आले. सदर रक्तदान शिबीराचे आय. डब्लुसी ग्यालेक्सी न्यु पनवेल यांच्या सहयोगाने आणि ऐम.जी. ऐम हॉस्पिटल कामोठे. यांच्या सहकार्याने पार पडले. अध्यक्ष मंगेश परुळेकर यांनी २०५ युनीट विक्रमी रक्तदाना बद्दल पनवेलकरांचे आभार मानले.



**पनवेल : हिंदू लोहार समाज पनवेल तालुका सामाजिक विकास मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवारी कमलाकर खंडागळे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. यावेळी महापौर नितीन पाटील, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर तसेच सपना पाटील आदी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.**

# पनवेल कल्चरल सेंटरच्या विस्तारित कक्षाचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

समाजासाठी चांगलं काही करणाऱ्या व्यक्ती वा समाज यांच्या पाठीशी समाज आजही उभा राहतो हे नुकतंच पुन्हा एकवार सिद्ध झालं. निमित्त झालं ते पनवेल कल्चरल सेंटर संचालित पं. विष्णू दिगंबर पलुस्कर संगीत नृत्य आणि कला विद्यालयाच्या पहिल्या मजल्यावरील विस्तारित कक्षाच्या उद्घाटनाचे. हे उद्घाटन नुकतेच सुप्रसिद्ध उद्योजक आणि संस्थेचे हितचिंतक विलास कोठारी यांच्या हस्ते पार पडले. याप्रसंगी गानगुरु पं. मेघनाथ कोल्हापुरे आणि पं. बाबादास तुपे आवर्जून उपस्थित होते.

आजकाल पनवेल-नव्या मुंबईतील जागांना आलेले महत्व, जागांची कमतरता व त्यामुळे जागांच्या भरमसाठी किंमती, जगांवरुन होणारे कलह, कोर्ट-कचेऱ्या या सगळ्या पार्श्वभूमीवर बांधकाम व्यावसायिक विलास कोठारी यांनी व्ही. के. हायस्कूलजवळच्या आशीर्वाद इमारतीतील स्वतःची जवळजवळ एक हजार चौरस फुटाची जागा पनवेल कल्चरल सेंटरच्या संगीत विद्यालयास कोणताही मोबदला न घेता वापरायला दिली याबद्दल त्यांचे शहरात कौतुक होत आहे. तळोजा येथील व्हिस्टा प्रोसेस्ड फूडस् प्रा. लि. या कंपनीने त्यांच्या सीएसआर फंडातून दिलेल्या देणगीतून या जागेचे नूतनीकरण-सुशोभिकरण करण्यात आले.

उद्घाटनानंतर विद्यालयातील नियोजित भरतनाट्यम शिक्षिका सई जोशी यांचे भरतनाट्यम सादरीकरण तसेच सतार शिक्षिका पल्लवी कुमार यांचे सतार वादन झाले. त्यांना तबला साथ राहुल पेठे यांनी केली. यानंतर नियोजित बासरी शिक्षक प्रसन्न जोशी यांचे बासरी वादन झाले. त्यांना संस्थेच्या विद्यालयातील तबला शिक्षक संतोष मसणे आणि पं. किशोर पांडे यांनी तबला साथ केली. याप्रसंगी संस्थेने केलेल्या आवाहनास प्रतिसाद म्हणून अनेक मान्यवर संस्थेला विविध वाद्यांची देणगी दिली आहे.

# बदलत्या काळातील पालकत्व विषयावर बालरोग संघटनेतर्फे पालक शिक्षकांकरिता विशेष चर्चासत्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हल्ली झालेले शहरीकरण, औद्योगीकरण, जीवघेणी स्पर्धा, समाज माध्यमांचा किशोरवयीन मुलांवर होणारा वाढता प्रभाव, त्याचे मुलांवर होणारे गंभीर दुष्परिणाम, मुलांमधील वाढलेली व्यसनाधीनता, वाढलेल्या वर्तन समस्या व हिंसाचार यामुळे पालक वर्ग थोडासा भांबावलेला आहे. या समस्या लक्षात घेऊन रायगड बालरोग संघटनेमार्फत "बदलत्या काळातील पालकत्व" या ज्वलंत, जिव्हाळ्याच्या आणि महत्त्वाच्या विषयावर शनिवार दि. १३ जून २०२६ या दिवशी स. ११ ते १ या दरम्यान एक विशेष परिसंवाद व चर्चासत्र आयोजित केले असून हे चर्चासत्र आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह या ठिकाणी होणार आहे.

या चर्चासत्राचे सूत्रसंचालन प्रसिद्ध बालरोग तज्ञ, संवादक, वक्ते व लेखक डॉ. अमोल अन्नदाते करणार असून यात डॉ निशिकांत कोतवाल (नागपूर), डॉ. जयंत पांढरीकर (अमरावती) डॉ चंद्रशेखर दाभाडकर (महाड) डॉ सुचित तांबोळी (अहिल्यानगर) व डॉ. नीलिमा भांडारकर (पनवेल) हे या विषयातील तज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. परिसंवादानंतर ते शंका समाधान ही करणार आहेत. या चर्चासत्रात सर्व पालक व शिक्षकांनी बहुसंख्येने सहभागी व्हावे असे आवाहन अधिवेशनाच्या मुख्य संयोजिका डॉ. चित्रा कुलकर्णी व या कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. जय भांडारकर यांनी केले आहे.

# रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये ओरिएंटेशन कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात दि. ६ जून रोजी ओरिएंटेशन कार्यक्रम पार पडला.

या ओरिएंटेशन ला १२ वी विज्ञान आणि वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांसाठी आणि पालकांसाठी १२ वी मध्ये वर्षभर होणारा सर्व अभ्यास, सेमिनार, कार्यशाळा यांची माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षाची दिशा, परिक्षा पध्दती तसेच करिअर संधी याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. पालकांना देखील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी आवश्यक सहकार्य, शाळेच्या नियमावली व अपेक्षा याची माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमात प्राचार्या निशा नायर यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. पालकांनीही कार्यक्रमाला सकारात्मक प्रतिसाद देत कार्यैक्रमाचे आयोजन केल्याबद्दल प्राचार्यांचे आभार मानले.



## संपादकीय

# करपलेले कडबोळे

इंडिया आघाडीच्या नेत्यांपैकी कुणालाही आजवर मोदी सरकारसमोर साधा टिकावही धरता आलेला नाही. आव्हानाची तर बातच सोडून द्या. यावेळीही या नेत्यांच्या भाषेत आणि आचारविचारात फारसा फरक पडलेला दिसत नाही. आपण सर्व एकजुटीने उभे राहिलो तर मोदी सरकारचा पाडाव करणे अशक्य नाही अशी या नेत्यांची धारणा आहे. अर्थात या धारणेलाही अनेक वेळेला तडे गेले आहेत. मुळात ही सर्व मंडळी जनतेने वारंवार नाकारलेली असून त्यांची विश्वासार्हता सपशेल संपुष्टात आलेली आहे.

**जवळपास दोन वर्षांच्या दीर्घ झोपेनंतर भारतीय राजकारणाच्या पाण्यातील इंडिया आघाडी नावाच्या म्हशीने एकदाची हालचाल केली. अर्थात अजुन ही म्हैस पाण्याबाहेर आलेली नाहीच. राजधानी दिल्लीत इंडिया आघाडीचे पंचवीस नेते सोमवारी एकत्र आले खरे, पण दोन–तीन तास बैठक आणि एखाददुसरी कॉफी यापलीकडे त्यातून काही हाती लागणे अशक्यच होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना बुलंद आव्हान देण्यासाठी इंडिया आघाडीचा घाट गेल्या लोकसभा निवडणुकीच्या आधी घातला गेला होता. तेव्हापासून ही नौटंकी चालू आहे. देशभरातील तमाम मोदीविरोधक नेते आणि पक्ष इंडिया आघाडीच्या नावाखाली आजवर जेमतेम पाचएक वेळा भेटले आहेत. नुकत्याच झालेल्या पश्चिम बंगालच्या निवडणुकीत ममता बॅनर्जी यांचा दारूण पराभव करत भारतीय जनता पक्षाने विजयाची मुहुर्तमेढ रचली. पश्चिम बंगालमध्ये सध्या उत्साहाचे वातावरण आहे. विकासकामांचा ओघ तिथे ताबडतोब सुरू झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विकासाची भाषा जनतेला आता पटून गेलेली आहे. भारताचे भवितव्य पंतप्रधान मोदी यांच्या हातात सुरक्षित आहे हा जनतेचा विश्वास पंतप्रधानांनी कधीही डगमगू दिलेला नाही. इंडिया आघाडीची ही नेतेमंडळी दोन वर्षांपूर्वी अशीच भेटली होती तेव्हा ईडी आणि आयकर अधिकाऱ्यांच्या छाप्यांनी त्यांची चिंता वाढवलेली होती. एकत्र राहिलो तर कदाचित वाचू या बचावात्मक पवित्र्यातच त्यांनी एकजुटीचा नारा दिला होता. सोमवारी राजधानी दिल्लीत इंडिया आघाडीचे नेते भेटले तेव्हाही त्यांची तोंडे वेगवेगळया दिशांनाच असल्याचे उघड झाले. गेल्या वेळी भाजपविरुद्ध जोरदार मुक्ताफळे उधळणारे दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यावेळी या बैठकीकडे फिरकले देखील नाहीत. तामिळनाडूत काँग्रेसच्या विश्वासघाताचा झटका सहन न झालेले द्रमुकचे नेते एमके स्टॅलिन यांनी तर आता या आघाडीपासून फारकतच घेतली आहे. महाराष्ट्रातून उद्धव ठाकरे यांनी ऑनलाइन उपस्थिती दर्शवली. पश्चिम बंगालमध्ये पुरता पराभव झालेल्या ममता बॅनर्जी इंडिया आघाडीच्या बैठकीत आपले अस्तित्व राखण्यासाठी धडपडत होत्या. त्याच तीन तासांमध्ये त्यांचा तृणमूल काँग्रेस पक्ष दुसऱ्यांदा फुटला. तृणमूलचे २० खासदार स्वतंत्र गट म्हणून यापुढे सभागृहात बसलेले दिसणार आहेत. ममता दीदी आणि अभिषेक बॅनर्जी यांच्या कारभाराला कंटाळून त्यांनी हा निर्णय घेतला आहे. या बैठकीत नेहमीप्रमाणे व्होटचोरीचे आरोप झाले. व्होटचोरी, एसआयआरला विरोध, नीट परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांचा झालेला विश्वासघात तसेच मतदारयाद्यांसंदर्भात सरन्यायाधीशांना पत्र लिहिणे या मुद्यांवर चर्चा झाल्याचे काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितले. हे सारे पाहता इंडिया आघाडीच्या नेत्यांना आताच एकजूट दाखवण्याचे प्रयोजन तरी काय होते असा प्रश्न कोणाला पडेल. या सर्व नेत्यांसाठी अस्तित्वाची अंतिम लढाई सुरू झाली आहे एवढेच त्याचे उत्तर सध्या देता येईल. कारण इंडिया आघाडी नावाचे हे कडबोळे कधीच करपले आहे.**

# राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार कायदा; पणन सुधारणांचा नवा अध्याय



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात राज्यातील पणन व्यवस्थेत क्रांतिकारी परिवर्तन घडवणारा राष्ट्रीय महत्वाचा बाजार कायदा हिवाळी अधिवेशनात संमत झाल्यानंतर आता मुंबई आणि नागपूर कृषी उत्पन्न बाजार समित्यांना 'राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार' घोषित करण्यात आले आहेत. कायद्यानुसार पणनमंत्री जयकुमार रावल यांनी दोन्हीही राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार अध्यक्षपदाचा पदभार स्वीकारला आहे. हा कायदा राज्यातील पणन व्यवस्था अधिक पारदर्शक, स्पर्धात्मक आणि अत्याधुनिक संसाधनांनी सुसज्ज करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतमालाला राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर स्पर्धात्मक दर मिळवून देण्यासाठी व्यापक बाजारपेठ उपलब्ध होणार आहे.

शेतकरी हित, बदलती अत्याधुनिक पणन व्यवस्था, वेगाने पुढे जाणारी जागतिक अर्थव्यवस्था आणि आधुनिक कृषी व्यापाराच्या गरजा लक्षात घेतल्या तर हा कायदा काळाची गरज असून सक्षम पणन सुधारणाचा नवा अध्याय आहे असे या कायद्याच्या उद्देशातून स्पष्टपणे दिसून येते.

राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा इतिहास शंभर वर्षांहून अधिक जुना आहे. महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती कायदा १९६३मध्ये अस्तित्वात आला. कोणताही कायदा कायमस्वरूपी अपरिवर्तनीय नसतो. बदलत्या काळानुसार तंत्रज्ञानानुसार आणि बाजारपेठेच्या गरजेनुसार त्यामध्ये सुधारणा कराव्याच लागतात. कृषी पणन क्षेत्रातील सुधारणांचा प्रवास पारंपरिक बाजार समित्यांपासून खासगी बाजारांपर्यंत झाला आणि आता त्याच सुधारणांचा पुढील टप्पा म्हणजे जागतिक पणन व्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर अत्याधुनिक पणन व्यवस्था असलेला 'राष्ट्रीय नामांकित बाजार' ही संकल्पना आहे.

या सुधारणांची बीजे २०२४–०५पासून पेरली गेली. त्यानंतर २०१७–१८मध्ये केंद्र सरकारने राज्यांना दिल्लीतील आझादपूर मंडीच्या धर्तीवर राष्ट्रीय स्वरूपाच्या बाजारपेठा विकसित करण्याची सूचना केली होती. विविध राज्यांतून मोठ्या प्रमाणावर कृषी मालाची आवक होणाऱ्या बाजार समित्यांसाठी स्वतंत्र रचना तयार करण्याचा मसुदाही राज्यांना पाठविण्यात आला होता.

सध्याच्या बाजार समित्यांची रचना प्रामुख्याने स्थानिक प्रतिनिधित्वावर आधारित आहे. ज्या भागातून शेतीमालाची आवक होते त्या भागातील शेतकरी प्रतिनिधी निवडणुकीतून बाजार समितीवर निवडून येतात. परंतु मुंबई, नागपूर, नाशिक किंवा पुणे यासारख्या मोठ्या बाजारांमध्ये अनेक राज्यांमधून कृषी माल विक्रीसाठी येतो. अशा परिस्थितीत केवळ स्थानिक प्रतिनिधित्व पुरेसे ठरत नाही. त्या बाजाराशी संबंधित इतर राज्यांतील शेतकरी आणि व्यापार घटकांचे व्यापक प्रतिनिधित्व गरजेचे आहे.

पणन हा राज्य सूचीतील विषय असल्यामुळे परराज्यातील शेतकरी प्रतिनिधींना निवडणुकीद्वारे बाजार समितीवर आणणे शक्य नाही. ही मर्यादा दूर करण्यासाठी राष्ट्रीय बाजार कायद्यात नामनिर्देशित संचालक मंडळाची तरतूद करण्यात आली आहे. केंद्र सरकारनेही मोठ्या बाजारांसाठी तज्ज्ञ, अधिकारी, व्यापारी, शेतकरी प्रतिनिधी आणि इतर राज्यांतील सदस्यांचा समावेश असलेले संचालक मंडळ स्थापन करण्याची शिफारस केली होती.

याच अनुषंगाने राष्ट्रीय बाजारांमध्ये निवडणुका न घेता पणन मंत्री अध्यक्ष, पणन राज्यमंत्री उपाध्यक्ष तसेच वित्तीय संस्थांचे प्रतिनिधी, पणन संचालक, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी, व्यापारी प्रतिनिधी, अपेडा, शेतकरी प्रतिनिधी आणि कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश असलेले संचालक मंडळ नियुक्त केले जाणार आहे. या मंडळाच्या माध्यमातून मोठ्या बाजारांचे व्यवस्थापन अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर शेतकऱ्यांच्या शेतमालाला स्पर्धात्मक दर मिळवून देण्यासाठी परिणामकारक आणि राष्ट्रीय स्तरावरील गरजांशी सुसंगत होईल.

राष्ट्रीय बाजार म्हणून निवड होण्यासाठीही विशिष्ट निकष ठेवण्यात आले आहेत. किमान ८० हजार टन कृषी मालाची वार्षिक आवक असणे आणि किमान दोन राज्यांमधून कृषी माल विक्रीसाठी येणे आवश्यक राहणार आहे. त्यामुळे आशिया खंडातील सर्वात महत्त्वपूर्ण कृषी उत्पन्न बाजार समिती समजल्या जाणाऱ्या मुंबई व विदर्भातील अत्यंत महत्त्वपूर्ण असलेली कृषी उत्पन्न बाजार समिती नागपूर यांसारख्या मोठ्या बाजार समित्यांचे राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारात रूपांतर करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे व्यापक हित जोपासले जाणार आहे.

आज बाजार समित्यांना शंभर वर्षांहून अधिक काळ झाला असला तरी त्यांतील व्यवहारांची वाढ अपेक्षित प्रमाणात झालेली दिसत नाही. शेतमालाचे दर, सुविधा, पायाभूत व्यवस्था, अतिक्रमण, पारदर्शकता याबाबत अनेक तक्रारी सातत्याने होत असतात. अनेकदा निवडून आलेल्या संचालक मंडळांच्या अधिकारांनाही मर्यादा असतात. आता राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजाराचा दर्जा देण्यात आणि याचे अध्यक्ष थेट पणन मंत्री असल्याने बाजार समितीच्या कामकाजावर शासनाचा नियंत्रण राहणार आहे. यामुळे प्रशासनात अधिक पारदर्शकता आणि वेगवान कार्यक्षमता निर्माण होईल.

मोठ्या बाजारांमध्ये पणनमंत्री, पणन संचालक आणि तज्ज्ञ सदस्यांचा थेट सहभाग असल्यास धोरणात्मक निर्णय अधिक वेगाने घेता येतील, पायाभूत सुविधा जलद विकसित करता येतील आणि विविध राज्यांतील व्यापाऱ्यांची स्पर्धा वाढवून शेतकऱ्यांना स्पर्धात्मक दर मिळवून देता येतील.

बदलती अर्थव्यवस्था, वाढती जागतिक स्पर्धा, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि निर्यातक्षम फळे व भाजीपाल्याचे उत्पादन या सर्व बाबी लक्षात घेता, या क्षेत्रात मूलभूत सुधारणांची गरज निर्माण झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्य शासन सातत्याने शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवून राज्याची कृषी आणि विपणन व्यवस्था सक्षम करण्यासाठी हिताचे निर्णय घेत आहे. पणन मंत्री म्हणून जयकुमार रावल यांनी जबाबदारी स्वीकारल्यानंतर कालसुसंगत, शेतकरी–केंद्रित आणि स्पर्धात्मक पणन रचना उभारण्यासाठी नियोजनपूर्वक दूरगामी पावले उचलली आहेत.

या कायद्यामागील मुख्य उद्देश म्हणजे शेतमालाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडणारी आधुनिक पणन व्यवस्था निर्माण करणे हा आहे. अत्याधुनिक संसाधनांनी युक्त अशा राष्ट्रीय महत्त्वाच्या बाजारपेठा उभारून त्यामार्फत शेतमाल जलद पुरवठा साखळीने महामुंबई इंटरनॅशनल ॲग्रीकल्चर मार्केटशी जोडला जाणार आहे. पॅरिस येथील रुंगीस आंतरराष्ट्रीय मार्केटच्या धर्तीवर वाढवण बंदराजवळ सुमारे १२०० एकर क्षेत्रावर जागतिक दर्जाचे बाजार केंद्र उभारण्याचा सरकारचा मानस आहे. त्या दृष्टीने शासन पावले उचलत आहे.

या इंटरनॅशनल मार्केटच्या माध्यमातून ग्रेडिंग, सॉर्टिंग, पॅकिंग, मार्केटिंग, लॉजिस्टिक सुविधा व जलद पुरवठा साखळीच्या माध्यमातून राज्यात उत्पादित फळे, भाजीपाला व इतर शेतमाल अवघ्या १२ ते १४ तासांत आंतरराष्ट्रीय बाजारात पोहचवणे शक्य होणार असून त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक चांगले आणि स्थिर दर मिळतील.

राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार ही केवळ प्रशासकीय सुधारणा नसून राज्याच्या कृषी अर्थव्यवस्थेला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांशी जोडणारा महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. बदलत्या जागतिक स्पर्धेच्या युगात शेतकऱ्यांना अधिक बाजारपेठा, अधिक स्पर्धात्मक दर आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अशा सुधारणांची आवश्यकता आहे. त्यामुळे या कायद्याकडे शेतकरी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन हिताच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे. महाराष्ट्राच्या कृषी पणन व्यवस्थेला नवे बळ देणारा आणि भविष्यातील बाजारपेठांसाठी सक्षम बनवणारा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरू शकतो.

**–बी.सी. झंवर,**
**विभागीय संपर्क अधिकारी**




## रील्समध्ये भारतीय सर्वाधिक काय पाहतात?

इन्स्टाग्राम रील्स भारतात मनोरंजन आणि माहितीचा एक प्रमुख स्रोत बनले आहे. २०२६मध्ये भारतीय वापरकर्ते रील्सवर कोणत्या प्रकारचा कंटेंट सर्वाधिक पाहतात, हे 'मेटा'ने केलेल्या एका नवीन अभ्यासात असे समोर आले आहे.



इप्सॉसने केलेल्या या सर्वेक्षणात देशभरातील २३ शहरे आणि ग्रामीण भागांतील ४,०००हून अधिक लोकांचा समावेश होता. या अहवालानुसार भारतात कोणत्या विषयाशी संबंधित कंटेंट लोकांमध्ये सर्वाधिक लोकप्रिय आहे याची माहिती मिळाली आहे.

मेटाने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार भारतात सर्वात लोकप्रिय रील्स कंटेंट फॅशन आणि ट्रेंड्स या श्रेणींमध्ये आहे. सौंदर्य, मेकअप हे सर्वाधिक लोकप्रिय आहे. सुमारे ५२ टक्के युजर या दोन विषयांशी संबंधित रील्सना सर्वाधिक प्रतिसाद देतात.

यापाठोपाठ लाइफस्टाइल आणि फिटनेस कंटेंटला ४२ टक्के प्रतिसाद मिळताना दिसतो. याशिवाय विनोदी व्हिडिओंना ३९ टक्के, क्रीडा कंटेंटला ३८ टक्के आणि प्रवासाशी संबंधित व्हिडिओंना ३७ टक्के प्रतिसाद मिळाल्याचे अहवालात दिसले.


अहवालानुसार एक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवण्यात आले की, भारतीय युजर्स आता रील्स हे केवळ मनोरंजनासाठीच नव्हे, तर फिटनेस, फॅशन आणि दैनंदिन जीवनाशी संबंधित माहितीसाठीही पाहताना दिसतात आणि कमेंट व फॉरवर्डही करतात.

अहवालानुसार रील्सने लोकांच्या खरेदीच्या सवयींवरही प्रभाव टाकलाय. ८१ टक्के लोक नव्या वस्तूची माहिती रील्समधून मिळवतात, ६६ टक्के लोक ब्रँडचा विचार करण्यापूर्वी रिल पाहतात आणि अंतिम खरेदीत ४७ टक्के रील्सचा प्रभाव असतो.

हा प्रभाव 'जनरेशन झेड' (Gen Z) युजर्समध्ये आणखी जास्त आहे. अहवालानुसार, ८४ टक्के जेन झी युजर्स मेटा प्लॅटफॉर्मद्वारे नवीन उत्पादने आणि ब्रँड्स शोधतात. अगदी ग्रामीण भारतातही, ७३ टक्के लोक नवीन ब्रँड्ससाठी यावर विश्वास ठेवतात.

अहवालानुसार शहरी भारतातील दैनंदिन व्हिडिओ एंगेजमेंट ९८ टक्के होती, तर ग्रामीण भारतात हा आकडा ९४ टक्के होता. हा फरक खूपच कमी आहे आणि यावरून असे दिसून येते की ग्रामीण आणि शहरी भागांत हा आकडा सारखाच आहे.

# क्रांतिकारक वीर बिरसा मुंडा



**निमित्त**

बिरसा मुंडा यांचा आज स्मृतिदिन. बिरसा मुंडा हे एक भारतीय आदिवासी क्रांतिकारक होते. ते आदिवासी समाजाचे वीर नायक होते. त्यांची आज पुण्यतिथी आहे.

१९व्या शतकातील शेवटच्या वर्षात मुंडा जमातीच्या आदिवासींकडून इंग्रज सरकारविरुद्ध जनआंदोलने केली, त्याचे नेतृत्व बिरसा मुंडा यांनी केले होते. त्यांचा जन्म १५ नोव्हेंबर १८७५ रोजी झारखंडमधील उलीहातू येथे झाला. बिरसा मुंडा यांचे बालपण इतर मुंडा आदिवासी मुलांप्रमाणेच जंगलात व ग्रामीण भागात व्यतीत झाले. त्यांचे वडील जनावरे चारण्याचे काम करायचे. तेही वडिलांसोबत रानात जाऊन धनुर्विद्या व नेमबाजीचा सराव करायचे. बालपणीच त्यांचा नेम फार चांगला होता. पुढे मुंडा प्रसिद्ध वैष्णव भक्त आनंदानंद पांडे यांच्या संपर्कात आले.

वाचन व लेखन येत असल्याने बिरसा मुंडे यांनी महाभारत, रामायण व गीता असे अनेक हिंदू धार्मिक ग्रंथांचे वाचन केले. त्यांच्यासोबत राहून इंग्रजांच्या काळ्या धोरणाचा त्यांना फार तिरस्कार यायचा. बिरसा मुंडा यांनी १९००मध्ये इंग्रजांविरुद्ध विद्रोह करण्याची घोषणा केली व म्हटले, आम्ही ब्रिटिश शासनाच्या तत्वांविरुद्ध विद्रोहाची घोषणा करतो. आम्ही कधीच ब्रिटिशांच्या कायद्यांना मानणार नाही. आम्ही इंग्रजांचे अधिपत्य स्वीकारत नाही.

जो इंग्रज आमच्याविरुद्ध उभा राहील त्यास आम्ही यमसदनी पाठवू. यामुळे संतप्त ब्रिटिश सरकारने आपली सेना बिरसा मुंडा यास पकडण्यासाठी पाठविली. बिरसा मुंडा यांनी विविध जमातीच्या गटांना एकत्र आणले. त्यांना इंग्रजांविरुद्ध लढण्यास प्रेरित केले. इंग्रज सरकारने बिरसा मुंडा यास अटक केली. त्यांच्यासोबत ४६० आदिवासी युवकांनाही अटक करण्यात आली. अशा या थोर क्रांतिकारकाचे ९ जून १९०० रोजी निधन झाले.

बिरसा यांच्या आंदोलनाची ब्रिटिशांना गंभीरपणे दखल घ्यावी लागली. ब्रिटिशांनी 'छोटा नागपूर टेनन्सी क्टख्र मंजूर करून आदिवासींचे जमिनीवरील हक्क मान्य केले (१९०२). आदिवासी–हक्क, स्त्री–स्वातंत्र्य, मानवी प्रतिष्ठा यांच्यासाठी लढा देणारा पहिला आदिवासी नेता म्हणून बिरसा यांची ओळख आहे. रांची येथील डिस्टिलरी पुलाजवळ बिरसांची समाधी असून तेथे त्यांचा पुतळा उभारला आहे तसेच रांची येथील केंद्रीय कारागृहास आणि आंतरराष्ट्रीय विमानतळास बिरसा मुंडा यांचे नाव देण्यात आले आहे.

बिरसा यांनी शिक्षणाचा उपयोग आदिवासींचं जीवनमान उंचावण्यासाठी केला. आदिवासींचे जीवन अभ्यासले. जंगलात अनेक दिवस काढले. आदिवासींमध्ये जनजागृती केली. भारतीय संस्कृती, आयुर्वेद समजून घेतले. औषधी विज्ञानात पारंगत झाले. रुग्णांची सेवा करू लागले. घर स्वच्छ ठेवा. खोटं बोलू नका. एकजूट राहा. निर्णय पंचायतकडून करा, असा संदेश त्यांनी आदिवासींना दिला.

देशभरात विशेषतः बिहार, ओडिशा, झारखंड, छत्तीसगड, पश्चिम बंगाल या भागात बिरसा मुंडा यांना क्रांतीसूर्य मानले जाते. १५ नोव्हेंबरला बिरसा मुंडा यांची जयंती आदिवासी बांधव साजरी करतात. आदिवासी समाजात जन्माला येऊनसुद्धा त्यांनी महान असे कार्य केले. म्हणूनच त्यांचे आजही स्मरण केले जाते. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

### पोटॅशियम कमी झाल्याने काय खावे, काय टाळावे..

पोटॅशियम हे शरीरासाठी अत्यंत महत्त्वाचे खनिज आहे. स्नायूंचे कार्य सुरळीत ठेवणे, मज्जासंस्थेचे आरोग्य जपणे, हृदयाचे ठोके नियमित ठेवणे आणि शरीरातील द्रवांचे संतुलन राखणे यासाठी पोटॅशियमची गरज असते.



शरीरात पोटॅशियमची कमतरता निर्माण झाल्यास अशक्तपणा, स्नायूंमध्ये गोळे येणे, थकवा, चक्कर येणे, हृदयाचे ठोके अनियमित होणे यांसारख्या समस्या दिसू शकतात. त्यामुळे शरीरातील पोटॅशियमची पातळी योग्य राखणे महत्त्वाचे ठरते.

पोटॅशियम वाढवण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे आहारात पोटॅशियमयुक्त पदार्थांचा समावेश करणे. केळी हे पोटॅशियमचे उत्तम स्रोत मानले जातात. त्यामुळे रोजच्या आहारात केळीचा समावेश केल्यास फायदा होऊ शकतो. मात्र केवळ केळीच नव्हे तर नारळपाणी, संत्री, मोसंबी, डाळिंब, खरबूज, टरबूज आणि ॲव्होकॅडोसारखी फळेदेखील पोटॅशियमने समृद्ध असतात.

भाज्यांमध्ये बटाटा, रताळे, पालक, बीट, भोपळा आणि टोमॅटो यांमध्ये चांगल्या प्रमाणात पोटॅशियम आढळते. विशेषतः हिरव्या पालेभाज्या नियमित खाल्ल्यास शरीराला अनेक आवश्यक खनिजे आणि जीवनसत्त्वे मिळतात. डाळी, कडधान्ये, राजमा, हरभरा आणि काळे वाटाणे यांसारख्या पदार्थांचाही आहारात समावेश करावा.

शरीरातील पोटॅशियमची पातळी टिकवून ठेवण्यासाठी पुरेसे पाणी पिणेही महत्त्वाचे असते. अतिसार, उलट्या किंवा जास्त घाम आल्यामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाइट्स कमी होऊ शकतात. अशा वेळी डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य द्रवपदार्थ घेणे आवश्यक असते. नारळपाणी हा नैसर्गिक इलेक्ट्रोलाइट्सचा उत्तम स्रोत मानला जातो. अत्यंत प्रक्रिया केलेले पदार्थ, जास्त मीठ असलेले स्नॅक्स आणि फास्ट फूडचे प्रमाण कमी ठेवणेही गरजेचे आहे. शरीरात सोडियमचे प्रमाण वाढल्यास पोटॅशियमचे संतुलन बिघडू शकते. त्यामुळे ताजे, घरगुती आणि संतुलित अन्न खाण्यावर भर द्यावा.

पोटॅशियमची कमतरता असल्याचा संशय असल्यास स्वतःहून सप्लिमेंट्स घेण्याची घाई करू नये. काही व्यक्तींमध्ये, विशेषतः मूत्रपिंडांच्या आजारा असतील तर, जास्त पोटॅशियमही धोकादायक ठरू शकते. त्यामुळे रक्त तपासणी आणि डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच उपचार करणे योग्य ठरते.

# आमदार महेंद्र थोरवेंनी घेतली खालापूर नगरपंचायत प्रशासनाची झाडाझडती

## मुख्याधिकाऱ्यांना नागरिकांशी सुसंवाद ठेवण्याचा सल्ला

**खोपोली: प्रतिनिधी**

नगरपंचायत खालापूर कार्यालयात जेष्ठ नागरिक, समाजसेविका बेबीताई साळवी यांना मिळालेल्या अपमानास्पद वागणुकीनंतर आमदार महेंद्र थोरवे यांनी सोमवारी नगरपंचायत खालापूर कार्यालयात भेट देत ुख्याधिकारी कोमल कराळे यांना नागरिकांशी सुसंवाद ठेवा असे सुनावले, तर लोकप्रतिनिधींचीदेखील आपाापसात असलेल्या मतभेदावर कानउघाडणी केली.

खालापूरच्या माजी सरपंच बेबीताई साळवी या गावातील समस्या घेऊन मुख्याधिकारी कोमल कराळे यांच्याकडे गेल्या असताना त्यांना अपमानास्पद वागणूक मिळाल्याने खालापूर शहरातून मोठा संताप व्यक्त होत नागरिक दोन दिवसांपूर्वी नगरपंचायतीत एकवटले



होते .परंतु मुख्याधिकारी यांची भेट झाली नव्हती. याबाबतची माहिती आमदार महेंद्र थोरवे यांना मिळाल्यानंतर सोमवारी आमदार थोरवे यांनी नगरपंचायत कार्यालय गाठले. नगराध्यक्षा रोशना मोडवे, उपनगराध्यक्ष किशोर पवार, सर्व नगरसेवक नगरसेविका, नगरपंचायत कार्यालयाचे अधिकारी आणि मुख्याधिकारी यांच्यासोबत आमदार थोरवे यांनी बैठक घेतली. बैठकीला बेबीताई साळवी देखील उपस्थित होत्या.

आमदार थोरवे यांनी मुख्याधिकारी यांना समज देताना या अगोदरदेखील तुमच्याबाबत माझ्याकडे तक्रारी आल्या होत्या असे सांगताना नगराध्यक्षाना देखील मुख्याधिकारी सहकार्य करत नसल्याची तक्रारीचा उल्लेख देखील आमदारांनी केला. उर्मटपणे वागणाऱ्या मुख्याधिकारी यांची बदली करा, अशी मागणी बेबीताई साळवी यांच्यासह नागरिकांनी आमदारांकडे केली.

**आमदारांनी व्यक्त केली खंत**

खालापूर शहरात उभ्या राहिलेल्या स्वामी समर्थ मठासाठी पन्नास लाखाचा निधी लोकप्रतिनीच्या आपआपसात असलेल्या मतभेदांमुळे देता आला नाही अशी खंत आमदार थोरवे यांनी व्यक्त करताना नगरसेवकांना धारेवर धरले. पंधरा दिवसातून सर्व कामाचा आढावा आपण स्वतः घेऊ, असेही आमदार थोरवे यांनी सांगितले.

# दक्षिण रायगडात पावसाची हजेरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील दक्षिण भागातील काही तालुक्यांमध्ये सोमवारी (दि. ८) मौसमी पावसाने हजेरी लावली. त्यामुळे उष्णतेच्या प्रकोपाने त्रासलेल्या रायगडकरांना काहीसा दिलासा मिळाला.

प्रादेशिक हवामान विभागाने तुरळक ठिकाणी वादळी वारे, विजांच्या गडगडाटासह जिल्ह्यात पावसाची शक्यता वर्तवली होती. त्यानुसार सोमवारी दुपारनंतर दक्षिण रायगडातील तालुक्यांमध्ये पावसाने हजेरी लावली. माणगाव, महाड तालुक्यात पावसाच्या सरी कोसळल्या.

जिल्ह्यातील अनेक भागात सकाळपासून ढगाळ वातावरण होते. दुपारनंतर उत्तर रायगडात वादळी वारे वाहण्यास सुरूवात झाली. वाऱ्यासह पावसाचेही आगमन झाले. त्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली.

गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात तापमानाचा वाढला होता. हवेतील आर्द्रतेचे प्रमाणही वाढले होते. त्यामुळे उन्हाची काहीली जाणवत होती. घामाने अंग भिजून निघत होते. पावसाच्या शिडकाव्यामुळे उष्णतेच्या प्रकोपापासून रायगडकरांना काहीसा दिलासा मिळाला.

**कुळगांव बदलापूर नगर परिषद**

नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व),
कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल :- coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in, वेबसाईट :- http://kbmc.gov.in

जा.क्र. कुबनप/नगरोत्थान/सा.बां./१८८/२०२६-२७ दिनांक :- ०८/०६/२०२६

**जाहीर ई-निविदा सूचना ७ / २०२६-२७**

कुळगांव-बदलापूर नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजने अंतर्गत सन २०२६-२७ करिता प्रशासकीय मंजूर प्राप्त झालेल्या ०१ विकास कामांसाठी महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि.०९/०६/२०२६ ते दि. १६/०६/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत असून दि.११/०६/२०२६ रोजी दुपारी १२.०० वा. निविदा पुर्व बैठक नगरपरिषद कार्यालयात आयोजित केलेली आहे. तसेच सदरची ई - निविदा दि. १७/०६/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्याwww.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर नगरपरिषदेच्या सूचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

**सही/-**
**(मारुती गायकवाड)**
**मुख्याधिकारी**
तथा प्रशासक
कुळगांव बदलापूर नगरपरिषद कुळगाव

# कशेडी घाटात कार घुसली डंपरखाली

## मुलाचा मृत्यू, तर आई गंभीर जखमी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील भोगावच्या हद्दीत भरधाव कार पुढे जाणाऱ्या डंपरच्या मागील भागात खाली घुसल्याने दोन जण गंभीर जखमी झाले. मुंबई गोवा महामार्गावर कशेडी घाटात सोमवार, दि. ८ जून रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास झालेल्या या भीषण अपघातानंतर एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला तर महिला गंभीर जखमी झाल्याने तिच्यावर पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात प्रथम उपचार करून एमजीएम हॉस्पिटल कळंबोली येथे अधिक उपचारासाठी पाठवण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार ८ जून रोजी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास मुंबई गोवा महामार्गावर भुयारी महामार्गावरून मुंबईकडे भरधाव वेगाने जाणारी कार नियंत्रित न झाल्याने थेट पुढे जाणाऱ्या डंपरच्या मागील भागात घुसली या अपघातात कारच्या दर्शनी भागाचा चुराडा झाला.

या अपघाताची माहिती समजताच कशेडी पोलिस मदत केंद्राची पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर ढाकणे, उपनिरीक्षक गिमनेकर,पो. हेकाँ. केदार यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन जखमींना पोलादपूर ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. या अपघाताची माहिती मिळतात काळभैरव रेस्क्यू टीमचे अरुण मोहिते, लक्ष्मण कळंबे यांनीही घटनास्थळी धाव घेत मदतकार्य केले. क्रेनच्या साह्याने दोन्ही अपघातग्रस्त वाहने रस्त्याच्या बाजूला करून महामार्गावरील वाहतूक सुरळीत केली. या अपघाताची नोंद पोलादपूर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून अधिक तपास पो. काँ रंजेश पवार वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.



वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी
राम प्रहर

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**अपर तहसिलदार कार्यालय पनवेल**
दुसरा मजला, प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक,
आद्य क्रांतीकारक वासुदेव फडके नाटयगृहच्या समोर, ता. पनवेल,
जि. रायगड पिन : ४१०२०६.
E mail : uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र. मशा/फौजदारी/कात-४/जन्म नोंदीबाबत/२०२६

**नोटीस**

ज्याअर्थी, अर्जदार श्री. मान लालसिंग भुल, रा. तारा ता. पनवेल जि. रायगड यांनी त्यांची मुलगी कु. रंजना मान भुल, रा. तारा ता. पनवेल जि. रायगड हिच्या जन्माची नोंद दिनांक ०५/०६/२०१७ रोजी करणेबाबत या कार्यालयाकडे जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअनुषंगाने कु. रंजना मान भुल, रा. तारा ता.पनवेल हिच्या जन्मनोंदीबाबत कोणास काही हरकत /आक्षेप असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत हरकत अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचे कार्यालयाकडे दाखल करावा. विहीत वेळेत हरकत प्राप्त न झाल्यास नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.०५/०६/२०२६

**सही/-**
**(जितेंद्र इंगळे)**
अपर तहसीलदार पनवेल

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**अपर तहसिलदार कार्यालय पनवेल**
दुसरा मजला, प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक,
आद्य क्रांतीकारक वासुदेव फडके नाटयगृहच्या समोर, ता. पनवेल,
जि. रायगड पिन : ४१०२०६.
E mail : uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र. मशा/फौजदारी/कात-४/जन्म नोंदीबाबत/२०२६

**नोटीस**

ज्याअर्थी, अर्जदार श्री. मान लालसिंग भुल, रा. तारा ता. पनवेल जि. रायगड यांनी त्यांची मुलगी कु. रितु मान भुल, रा. तारा ता. पनवेल जि. रायगड हिच्या जन्माची नोंद दिनांक ०१/०६/२०१९ रोजी करणेबाबत या कार्यालयाकडे जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअनुषंगाने कु. रितु मान भुल, रा. तारा ता.पनवेल हिच्या जन्मनोंदीबाबत कोणास काही हरकत /आक्षेप असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत हरकत अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचे कार्यालयाकडे दाखल करावा. विहीत वेळेत हरकत प्राप्त न झाल्यास नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.०५/०६/२०२६

**सही/-**
**(जितेंद्र इंगळे)**
अपर तहसीलदार पनवेल

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**अपर तहसिलदार कार्यालय पनवेल**
दुसरा मजला, प्रशासकीय भवन, कर्मवीर भाऊराव पाटील चौक,
आद्य क्रांतीकारक वासुदेव फडके नाटयगृहच्या समोर, ता. पनवेल,
जि. रायगड पिन : ४१०२०६.
E mail : uppertahsildarpanvel@gmail.com

पत्र क्र. मशा/फौजदारी/कात-४/जन्म नोंदीबाबत/२०२६

**नोटीस**

ज्याअर्थी, अर्जदार श्री. मान लालसिंग भुल, रा. तारा ता. पनवेल जि. रायगड यांनी त्यांची मुलगी कु. विनिता मान भुल, रा. तारा ता. पनवेल जि. रायगड हिच्या जन्माची नोंद दिनांक ०३/०६/२०२१ रोजी करणेबाबत या कार्यालयाकडे जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ अन्वये अर्ज दाखल केला आहे.

त्याअनुषंगाने कु. विनिता मान भुल, रा. तारा ता.पनवेल हिच्या जन्मनोंदीबाबत कोणास काही हरकत /आक्षेप असल्यास त्यांनी हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत हरकत अपर तहसिलदार कार्यालय पनवेल यांचे कार्यालयाकडे दाखल करावा. विहीत वेळेत हरकत प्राप्त न झाल्यास नंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दि.०५/०६/२०२६

**सही/-**
**(जितेंद्र इंगळे)**
अपर तहसीलदार पनवेल

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की **मौजे वांगणी तर्फे वाजे,** तहसील - पनवेल, जिल्हा - रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्रीमती पुजा बाळाराम घरत, यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणे :-

**शेतजमीनीचे वर्णन**

**मौजे वांगणी तर्फे वाजे** तहसील पनवेल जिल्हा रायगड येथील मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील.

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| १३६/१ | ०-५२-४० | ०-०२-५० | ०-५४-९० | ११.१९ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन **१५** दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोष्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०८/०६/२०२६

**सही/-**
**ॲड. स्वप्निल व्यं. जाधव**
बी.ए.एल.एल.बी.

**कार्यालयीन पत्ता :** गाळा क्र. १५४ महानगरपालिका कॉम्प्लेक्स, तहसीलदार ऑफिसजवळ, दत्त झेरॉक्सच्या वरती, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६.
संपर्क:- ८८८८२७१७५९

**उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव, जि. रायगड यांज कडून**

**क्रमांक उविअमा भूसं / कात - २ / एस. आर. १७९ / २०२६,** ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा दोन ) चे कलम १, पोट कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र, भाग चार ब, पृष्ठ क्र. ०१ वर प्रसिध्द करण्यात आलेली उद्योग उर्जा व कामगार विभाग यांचेकडील अधिसूचना क्रमांक आयडीसी २०२४ / (प्र.क्र.४८) / उ -१४ अन्वये उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे खालील अनुसूचित विनिर्दोष्ट करण्यात आलेल्या क्षेत्रास फेब्रुवारी २०२६ या महिन्याच्या तेराव्या दिवसापासून अंमलात येतील, असे महाराष्ट्र शासनाने निर्देश दिले आहेत ;

आणि ज्याअर्थी, या खालील अनुसूचीत नमूद केलेल्या जमिनी हया उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्ताप्रमाणे अंमलात आले आहेत, अशा क्षेत्रांत आहेत;

आणि ज्याअर्थी, अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांस लागू करण्यात आले आहे, अशा क्षेत्रांत असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत (यानंतर ज्याचा " उक्त महामंडळ " असा उल्लेख करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पृष्टयर्थ असेल, अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमांच्या कलम ३२ अन्वये राज्यशासनास प्रदान करण्यात आली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम २, खंड (क) अन्वये काढण्यात आलेली अधिसूचना क्रमांक आयडीसी / १८९२ (१७४४१), उद्योग १४, दिनांक ११ जून, १९९३ अन्वये राज्य शासनाचे महाराष्ट्र औद्योगिक विकास नियम, १९६२ यातील नियम २८ अन्वये जी कामे जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आली आहेत, अशी उक्त अधिनियमाचे कलम ३२, कलम ३३ पोटकलम (२), कलम ३६ व कलम ३८ खालील जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग माणगांव यांची नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी सोबतच्या अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहेत, असे उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव यांचे मत झाले आहे;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाचे कलम ३२ पोटकलम (२) अन्वये उपरोक्त प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या शक्तींचा वापर करुन याद्वारे उपविभागीय अधिकारी, माणगांव उपविभाग, माणगांव खाली नमूद केलेल्या जमिनीमध्ये संबंधीत भोगवटादार तसेच इतर कोणत्याही व्यक्तिचा हितसंबंध आणि कोणताही अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना खाली उल्लेख केलेल्या जमिनीमध्ये उक्त प्रयोजनार्थ भूसंपादन का करण्यात येवू नये? या संबंधी ही **नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत** खाली सही करणाऱ्यास लेखी स्वरुपात कारणे दाखविण्याबद्दल नोटीस देत आहे.

ज्यांची व्यक्तीगत सुनावणी करण्याची इच्छा असेल अशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी, कार्यालयीन वेळेत खाली सही करणाऱ्यांच्या कार्यालयात माणगांव येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कयदेशीर मुखत्यारामार्फत हजर राहता येईल.

ठिकाण - माणगांव,
दिनांक - २७/०५/२०२६.

सही/-
(डॉ. संदीपान सानप)
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग, माणगांव**

**अनुसूची**
**जिल्हा - रायगड, तालुका - रोहा, गांव -गौळवाडी**

| अ.क्र. | सर्व्हे नंबर/गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | ७० | पैकी | १.२९० |
| २. | ७६ | पैकी | ०.७८० |
| ३. | ९७ | पैकी | ०.०५९ |
| ४. | १०१ | पैकी | ०.०५३ |
| ५. | १०२ | पैकी | ०.६१० |
| ६. | १०४ | १+२ पैकी | ०.०७० |
| ७. | १०५ | पैकी | ०.२२० |
| | | **एकुण** | **३.०८२** |

ठिकाण - माणगांव,
दिनांक २७/०५/२०२६.

सही/-
(डॉ. संदीपान सानप)
**उपविभागीय अधिकारी,**
**माणगांव उपविभाग, माणगांव**

क्र.जिमाका/रायगड/जाहिरात/३८/६९४/२०२६

# घनकचरा व्यवस्थापन अंमलबजावणीकरिता नवी मुंबई महानगरपालिका सज्ज

**नवी मुंबई : बातमीदार**

'घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६' हे दि. १ एप्रिल २०२६ पासून संपूर्ण देशभरात लागू झाले असून देशातील सर्वोत्तम स्वच्छ शहरांच्या 'सुपर स्वच्छ लीग' या विशेष कॅटेगरीत समाविष्ट नवी मुंबई शहर त्यांच्या अंमलबजावणीसाठी सज्ज झाले आहे. या अनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयातील ज्ञानकेंद्रात महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष माहितीपूर्ण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, घनकचरा व्यवस्थापन उपआयुक्त डॉ.अजय गडदे, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे तसेच सर्व विभागांतील स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, स्वच्छताविषयक कामांचे पर्यवेक्षक उपस्थित होते.

यावेळी आयुक्तांनी प्रत्येक विभागात किती स्वच्छताकर्मी कार्यरत आहेत, त्यावर किती पर्यवेक्षक आहेत, त्यांच्या स्वच्छतेच्या कामाच्या वेळा काय आहेत व प्रत्येक संबंधिताची जबाबदारी काय आहे याविषयी सविस्तर माहिती घेण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत दैनंदिन कचरा संकलन व वाहतूक प्रणालीवर अत्याधुनिक एकात्मिक आयसीसीसी प्रणालीव्दारे निरीक्षण व नियंत्रण ठेवण्यात येते. या कचरा वाहतूक नियंत्रण प्रणालीचा डॅशबोर्ड प्रत्येक स्वच्छता अधिकारी व निरीक्षकाच्या मोबाईलवर आजच उपलब्ध करुन दयावा असे निर्देश आयुक्तांनी दिले व त्याबाबतचे प्रशिक्षणही कार्यशाळा संपल्यानंतर लगेच त्याच ठिकाणी देण्यात यावे असेही आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले.

रस्ते, पदपथ, दुभाजक तसेच नेहमी कचरा टाकला जातो अशा जागा यामधील दैनंदिन साफसफाईची गुणवत्ता वाढविण्यासाठी स्वच्छताकर्मींना प्रोत्साहीत करावे व स्वच्छता अधिकारी आणि निरीक्षकांनी त्यावर दररोज गांभीर्याने लक्ष दयावे असे सूचित करतानाच यामध्ये निष्काळजीपणा आढळल्यास त्यावर कारवाई करण्यात येईल असे स्पष्ट निर्देश आयुक्तांमार्फत देण्यात आले.

स्वच्छतेविषयीची निरीक्षणे व अहवाल सादर करण्यासाठी ऑनलाईन यंत्रणा असावी तसेच स्वच्छता अधिकारी व स्वच्छता निरीक्षक स्तरावर दैनंदिन



आढावा, घनकचरा व्यवस्थापन उपआयुक्त स्तरावर आठवडयातून दोनदा आढावा, अतिरिक्त आयुक्त स्तरावर साप्ताहिक आढावा आणि महापालिका आयुक्त स्तरावर प्रत्येक पंधरवडयाला आढावा घेण्याची कार्यपध्दती सुरु करावी असेही निर्देश आयुक्तांनी यावेळी दिले.

नुकतीच नवी मुंबई महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांमार्फत महापालिका क्षेत्रातील ३८४ सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांची तपासणी करण्यात आली होती. त्या अनुषंगाने तपासणीत आढळलेल्या सुधारणा करावयाच्या बाबींची कामे सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभागाने त्वरित करुन घ्यावीत असे निर्देश आयुक्तांनी दिले. तसेच स्वच्छता निरीक्षकांनी आपल्या क्षेत्रातील स्वच्छतेची पाहणी करताना शौचालय स्वच्छतेचीही नियमित पाहणी करावी व ती वापरण्यायोग्य स्वच्छ राहतील याची विशेष काळजी घ्यावी असे निर्देश आयुक्तांनी दिले.

शौचालय व्यवस्थापनावर नियमित निरीक्षण व नियंत्रण राहावे याकरिता तत्परतेने 'टॉयलेट क्लिनिंग ॲप' बनविण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या. तसेच सीबीडी बेलापूर पारसिक हिल येथील विश्वनाथ महाराज समाधी मंदीराजवळ त्याचप्रमाणे बेलापूर किल्ला येथे सिडको गेस्ट हाऊसजवळ नागरिकांच्या सुविधेसाठी शौचालय बनवावीत असेही आयुक्तांनी सूचित केले.

'घनकचरा व्यवस्थापन नियम २०२६' नुसार कचऱ्याचे वर्गीकरण चार प्रकारे होणे गरजेचे असून ओला कचरा व सुका कचरा यासाठी अनुक्रमे हिरव्या व निळया रंगाचे मोठे डबे तसेच घरगुती घातक व सॅनिटरी कचऱ्यासाठी अनुक्रमे काळया व गुलाबी रंगाचे लहान डबे लवकरात लवकर उपलब्ध करुन दयावेत असेही आयुक्तांमार्फत निर्देश देण्यात आले.

ओल्या कचऱ्यामध्ये उरलेले अन्न, भाज्यांची साल, पाणी, चहापावडर अशा जैवविघटनशील कचऱ्याचा समावेश आहे.सुक्या कचऱ्यामध्ये कागद, पुठ्ठा, प्लास्टिकच्या वस्तू , धातू , काच अशा पुनर्वापरयोग्य साहित्याचा समावेश आहे.घरगुती घातक कचऱ्यामध्ये बॅटरी, औषधे, बल्ब, पेंटचे डबे, सिरींज अशा धोकादायक साहित्याचा समावेश आहे.सॅनिटरी कचऱ्यामध्ये सॅनिटरी पॅड, डायपर, बँडेज, आणि तत्सम स्वच्छताविषयक कचऱ्याचा समावेश आहे.

## नेरुळमध्ये क्लस्टर विकास आराखड्याचे सादरीकरण

**नवी मुंबई : बातमीदार , प्रतिनिधी**

सध्या नवी मुंबईत पुनर्विकासाचे वारे वाहत आहेत. त्या अनुषंगाने भाजपच्या महापौर सुजाता पाटील व नगरसेवक सुरज पाटील यांनी नेरूळ येथे पुनर्विकास व क्लस्टर विकासासंदर्भात सादरीकरण आयोजित केले होते.

रविवार दिनांक ७ जून २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता देवडीगा भवन हॉल, सेक्टर-१२, नेरुळ, नवी मुंबई येथे सर्व सोसायटी सदस्यांच्या उपस्थितीत या आराखड्याचे सादरीकरण करण्यात आले.

यावेळी वास्तू विशारद संदेश पाटील यांनी भविष्यातील सुनियोजित, आधुनिक व सर्वांगीण विकसित सेक्टर-८ ची संकल्पना नागरिकांसमोर मांडली. पुनर्विकासासाठी लागू असलेली नियमावली, उपलब्ध क्षेत्रफळाचा प्रभावी वापर, रहिवाशांना मिळणारे फायदे तसेच पुनर्विकासाशी संबंधित विविध तांत्रिक बाबींविषयी त्यांनी सविस्तर माहिती दिली.सादरीकरणादरम्यान उपस्थित नागरिकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांचे व शंकांचे समाधानकारक निरसन करण्यात आले. या बैठकीत स्थानिक नगरसेविका तथा "ब" प्रभाग समिती सभापती रुपाली भगत, तसेच सेक्टर-८ मधील सर्व गृहनिर्माण संस्थांचे पदाधिकारी, सदस्य व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थितांनी प्रस्तावित विकास आराखड्याचे स्वागत करत परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक प्रतिसाद दर्शविला.



# पनवेल बसस्थानक परिसरात नियमांची पायमल्ली; रात्रभर चहा टपऱ्या गजबजलेल्या, गुटख्याची तेजीत विक्री

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल बसस्थानक परिसरात महाराजा स्वीटस कॉर्नरसमोर उड्डाणपुलाखाली रात्रीच्या वेळी नियमांचे उल्लंघन करून बेकायदेशीर चहाच्या टपऱ्या आणि दुकाने रात्रभर सुरू राहत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. काही टपऱ्यांवर प्रतिबंधित गुटखा, सुगंधित तंबाखू आणि सिगारेटची राजरोसपणे मोठ्या प्रमाणावर विक्री केली जात आहे. या वाढत्या अवैध व्यवसायांवर अन्न व औषध प्रशासनाने (FDA) तातडीने कडक कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

मुंबई आणि कोकणला जोडणारे मुख्य केंद्र असलेल्या पनवेल बस स्थानक परिसरात सध्या रात्रीच्या वेळी अवैध धंद्यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. शासकीय नियमांनुसार ठरावीक वेळेनंतर दुकाने व टपऱ्या बंद करणे बंधनकारक असतानाही या परिसरात अनेक चहाच्या टपऱ्या आणि स्टॉल्स रात्रभर सुरू राहत आहेत. सर्वात गंभीर बाब म्हणजे, राज्यात बंदी असलेला गुटखा आणि सुगंधित तंबाखू या टपऱ्यांवर अगदी सहज आणि चढ्या दराने विकला जात आहे.

**रात्रीच्या अंधारात अनधिकृत व्यवसाय तेजीत**

रात्रीच्या वेळी एसटीने प्रवास करणारे प्रवासी, चालक आणि वाहक यांच्या नावाखाली हे चहाचे स्टॉल्स सुरू ठेवले जातात. मात्र, मध्यरात्रीनंतर या ठिकाणी स्थानिक टवाळखोर, गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक आणि अंमली पदार्थांचे सेवन करणाऱ्यांची गर्दी वाढत असल्याचे दिसून येत आहे. चहाच्या आडून 'सिगारेट आणि गुटखा उपलब्ध' असल्याचे फलक लावून किंवा छुप्या




पद्धतीने अमली पदार्थांची विक्री केली जात आहे.

**आरोग्याशी खेळ आणि सुरक्षेचा प्रश्नबंदी असलेल्या पदार्थांची विक्री**

महाराष्ट्र राज्यात गुटखा आणि सुगंधित तंबाखूच्या विक्रीवर पूर्णपणे बंदी आहे. असे असतानाही पनवेल डेपोबाहेर याची राजरोस विक्री अन्न व औषध प्रशासनाच्या (FDA) कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

**अस्वच्छता आणि भेसळ**

रात्रभर उघड्यावर बनवला जाणारा चहा आणि खाद्यपदार्थ अत्यंत अस्वच्छ वातावरणात तयार केले जातात, ज्यामुळे प्रवाशांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

**गुन्हेगारीला खतपाणी**

रात्री उशिरापर्यंत चालणाऱ्या या गर्दीमुळे परिसरात वादावादी आणि हाणामाऱ्यांचे प्रकार घडत असून, महिला प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे.


**अन्न व औषध प्रशासनाने कारवाई करण्याची गरज**

स्थानिक पोलीस आणि अन्न व औषध प्रशासनाचे (FDA) या गंभीर प्रकाराकडे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. केवळ एखादी थातुरमातूर कारवाई न करता, अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांनी या ठिकाणी रात्रीच्या वेळी अचानक छापे टाकून अवैध साठा जप्त करणे आणि संबंधित टपरी चालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे गरजेचे आहे."प्रवाशांच्या हक्काच्या आणि सुरक्षिततेच्या पनवेल बस स्थानक परिसराला अशा अवैध धंद्यांचे केंद्र बनू देऊ नये, यासाठी प्रशासनाने तात्काळ मोहीम हाती घ्यावी," अशी तीव्र भावना पनवेलमधील सुजाण नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# एपीएमसीच्या पाच वर्षांच्या कामकाजाची होणार चौकशी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे मागील पाच वर्षांत जे काम झाले आहे, त्याची चौकशी करण्याचे आदेश पणन संचालक शरद जरे यांनी दिले आहेत. यासाठी विभागीय सहनिबंधक एस. एम. पाटील यांच्या नेतृत्वाखाली चार सदस्यीय विशेष चौकशी पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकाला दोन महिन्यांच्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



यामध्ये मुंबई कृषि उत्पन्न बाजार समितीचे कामकाज व सन २०२१-२०२२ ते ३१ जुलै २०२५ या कालावधीतील लेख्यांची तपासणी करणे, लेखापरिक्षण विहित मुदतीत पूर्ण होऊन त्याबाबतचा दोषदुरुस्ती अहवाल सादर न करणे तसेच सदर लेखापरिक्षण व दोषदुरुस्ती सादर न झाल्याची कारणे व संबंधित जबाबदार व्यवस्थापन यांची चौकशी करणे, बाजार समितीच्या उत्पन्नात वाढ झाली नसल्याची कारणमिमांसा करुन जबाबदारी निश्चित करणे, बाजार समितीमधून मोठ्या प्रमाणात शेतमालाची आयात निर्यात होत असल्याने त्या प्रमाणे बाजार समितीमध्ये स्वतंत्र आयात निर्यात कक्ष स्थापन करणे आवश्यक होते. असे असताना देखील तसे न झाल्याने आयात निर्याती बाबत निश्चित आकडेवारी उपलब्ध होऊ शकत नाही.

सदर कक्ष स्थापन केल्यास बाजार समितीच्या बाजार फीच्या उत्पन्नात वाढ होईल. सद्यस्थितीत बाजार समिती आलेला शेतमालाची नोंद व सदर शेतमाल आयात निर्यात झाला आहे याबाबत अचुक माहिती उपलब्ध होऊ शकत नसल्याने चौकशी करुन जबाबदारी निश्चित करण्यांत करणे, बाजार समिती मध्ये किरकोळ विक्री व्यवसाय बंद करण्याबाबत न्यायालयाने २०१५ साली दिलेल्या निर्देशाप्रमाणे अंमलबजावणी होत नसणे.

बाजार समितीच्या बाजार आवारात काही गाळ्यांवर व्यापारी या घटकांसाठी एकापेक्षा जास्त व्यक्तींना अनुज्ञप्ती देण्यांत येणे, बाजार समितीने व्यापारी संघटना यांच्या शिफारशीनुसार विकास टप्पा-२, मार्केट-१ (मसाला मार्केट) येथे अनुज्ञप्ती देणे या कामांची चौकशी करण्यात येणार आहे.

तसेचबाजार समितीच्या कामकाजात झालेली कथित अनियमितता, आर्थिक व्यवहार, परवाना वितरण, अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणे आणि उत्पन्नातील घसरण यांसह २० महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चौकशी होणार आहे. परवाना वितरणातील कथित गैरप्रकार आणि सेवाशुल्क वसुलीतील अनियमितता याबाबत गेल्या काही वर्षांत अनेक तक्रारी सरकारकडे करण्यात आल्या; मात्र, या तक्रारींवर प्रत्यक्ष कारवाई होत नव्हती.

या चौकशीदरम्यान सन २०२१-२२ ते जुलै २०२५ या कालावधीतील आर्थिक व्यवहार, लेखापरीक्षणातील त्रुटी, बाजार समितीच्या उत्पन्नातील स्थिरता, आयात-निर्यात नोंदींची अचूकता, परवाना वितरणातील प्रक्रिया आणि सेवाशुल्क वसुलीची स्थिती यांची तपासणी केली जाणार आहे.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण व स्वच्छता अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

५ जून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आदर्श शैक्षणिक समूहाच्या श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेल येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा वृक्षारोपण व स्वच्छता अभियानाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला.

आदर्श समूहाचे चेअरमन धनराज विसपुते यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच संस्थेच्या सचिव संगीता विसपुते यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिका व श्री. बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



'एक वृक्ष, हजारो श्वास' या भावनेतून विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांनी मोठ्या उत्साहाने वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित केली. हिरवाईचे संवर्धन हीच भावी पिढ्यांसाठीची सर्वात मोठी देणगी आहे, या विचारातून विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. याचबरोबर पर्यावरण संरक्षणाचा संदेश अधिक प्रभावीपणे समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी स्वच्छता अभियानाचेही आयोजन करण्यात आले. परिसर स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्याचा संकल्प उपस्थितांनी यावेळी व्यक्त केला.

या प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विनायक लोहार, सौ. कांचन देशमुख, डॉ. नेहा म्हात्रे, प्रा. सुषमा संकपाळ, प्रा. राजू गायकवाड, सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. निसर्गाशी मैत्री, पर्यावरणाबद्दलची संवेदनशीलता आणि सामाजिक उत्तरदायित्व यांचा सुंदर संगम घडवून आणणारा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत मिळावी या उद्देशाने श्री द्वारकाधीश चॅरिटीज ट्रस्ट तर्फे जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले.

या उपक्रमाअंतर्गत जिल्हा परिषद शाळा कल्हे येथील ७८ विद्यार्थ्यांना, जिल्हा परिषद शाळा बानुबाईवाडी येथील ३५, जिल्हा परिषद शाळा दाभोळवाडी येथील २६, जिल्हा परिषद शाळा गंगेचीवाडी येथील ८ आणि

**विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप**

रसायनी पाताळगंगा अतिरिक्त एम आमडीसी जवळच्या दुर्गम भागातील जिल्हा परिषद शाळा माडभुवन (सारसई) येथील १८ अशा एकूण १६५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी सहा वह्या, पेन, पेन्सिल, खोडरबर, शार्पनर आणि पाऊच यांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास श्री द्वारकाधीश चॅरिटीज ट्रस्टचे अध्यक्ष अजित कारखानीस, विश्वस्त अमित कारखानीस, मयुरा कारखानीस तसेच आसावरी कारखानीस, ममता मांजरेकर, दिगंबर गोगटे, विजय ढवळे, डॉ. मयुरेश पिंपुटकर आणि ट्रस्टचे समन्वयक योगेश ताटे उपस्थित होते.

सदर उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यासाठी महाराष्ट्र सरकार पुरस्कृत आदिवासी सेवक रत्नाकर घरत यांनी विशेष सहकार्य केले. विद्यार्थ्यां करता भविष्यातही अशा सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे ट्रस्टच्यावतीने सांगण्यात आले.





## शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष सातारा जिल्हाप्रमुख प्रभारीपदी भरत जाधव

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिवसेना शिंदे गट पनवेल तालुका प्रमुख भरत जाधव यांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष सातारा जिल्हा प्रमुख प्रभारी पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

भरत जाधव हे पनवेल येथील शिवसेनेचे तालुकाप्रमुख आहेत. त्यांनी अनेक सामाजिक कार्य केलेले आहे. तसेच वैद्यकीय मदत करण्यात ते आघाडीवर आहेत. त्यांची वैद्यकीय मदत कक्ष सातारा जिल्हा प्रमुख प्रभारी पदी नियुक्ती झाल्यामुळे त्यांच्यावर विविध स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

## पनवेल कल्चरल सेंटरतर्फे सुगम संगीत स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक संगीत दिवसानिमित्त (दि.२१ जून) पनवेल कल्चरल सेंटरने ८ ते १५ वर्षे वयोगटातील मुला-मुलींसाठी सुगम संगीत स्पर्धेचे आयोजन केले असून यात स्पर्धकांना भावगीते/भक्तीगीते सादर करता येतील. यासाठी स्पर्धकानी त्यांच्या आवडीची ३ गाणी आणि त्यांचे स्वर लिहून पाठवायचे आहेत. त्यांनी कोणतं गाणं गायचंय हे स्पर्धेच्या आधी सांगण्यात येईल.या स्पर्धेच्या प्रथम क्रमांक विजेत्यास रु.३,००० चे रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात येईल, द्वितीय क्रमांक रु.२,५०० चे रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात येईल. तर तृतीय क्रमांक रु. २,००० चे रोख पारितोषिक व सन्मानचिन्ह देण्यात येईल. प्रत्येक सहभागी स्पर्धकाला प्रमाणपत्र दिले जाईल. नाव नोंदणीची शेवटची तारीख १२ जून २०२६ असून स्पर्धेची तारीख २१ जून २०२६ आहे.



## मोहोपाडा महावितरणकडून मान्सूनपूर्व कामे अंतिम टप्प्यात

**मोहोपाडाः प्रतिनिधी**

मोहोपाडा विजवितरण कार्यालयाकडून मान्सूनपुर्व कामे अंतिम टप्प्यात आली असून मोहोपाडा विजवितरणाचे उप अभियंता लक्ष्मीकांत गलांडे यांनी पावसाळ्यापुर्वी विज वितरणाची कामे पुर्ण करतो असे रसायनीकरांना आश्वासन दिले होते,ते पुर्ण होत असल्याचे दिसून येत आहे.

त्यात वृक्ष फांदी छाटणी, रिजम्परिंग, उच्च दाब वाहिनीची दुरुस्ती,एचओसी फिडर रिजंम्परिंग,मासळी बाजारासमोरील जिओडी रिपलेसमेंट आणि इतर मेंटेनन्सची सर्व कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. मोहोपाडासह आसपासच्या परिसरातील फांदी छाटणी, उच्च दाब वाहिनी बदलणे आदी कामे वीज वितरणाचे अधीक्षक अभियंता बिक्कड, कार्यकारी अभियंता देशमुख ,शिंदे, उपकार्यकारी अधिकारी राख यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोपाडा वीज वितरणाचे उपअभियंता लक्ष्मीकांत लाला गलांडे -पाटील यांच्यावतीने मोहोपाडा परिसरात कामे सुरू आहेत.

# वादळात पडलेला विद्युत खांब एक महिन्यानंतरही जैसे थे!

## मोरबे येथे रहदारीच्या रस्त्यावर अडचण



**चौक : प्रतिनिधी**

८ मे रोजी आलेल्या वादळात मोरबे धरणग्रस्त वसाहतीच्या ठिकाणी विद्युत खांब आडवा पडला. एक महिना पूर्ण होत असून आजही तो खांब तसाच पडून आहे. त्यामुळे ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

मोरबे धरणग्रस्त असलेल्या कर्जत–चौक रस्त्यावरील मोरबे गावात ८ मे रोजी वादळ आणि पावसाने थैमान घातले होते. वावंढळ गावापासून अनेकांची घर ते विद्युत् खांब व वाहिन्या यांचे मोठे नुकसान झाले. तीन दिवसांनी या परिसरात वीजपुरवठा सुरू झाला, मात्र मोरबे गावात आडवा झालेला विद्युत खांब आजही तसाच आहे.

याबाबत स्थानिक सामाजिक कार्यकर्ते मिलिंद राणे यांनी विद्युत मंडळाचे अधिकारी व स्थानिक कर्मचारी यांची भेट घेऊन त्यांना परिस्थिती सांगितली, पण एक महिना झाला तरी ना अधिकारी, ना कर्मचारी फिरकला. हा विद्युत खांब रस्त्यावर आडवा पडला असल्याने रहदारीला अडचण निर्माण होते. गाडी जात नसल्याने एक तर फिरून जावे लागते अथवा गाडी उभी करून पुढे जावे लागत आहे.

या खांबावर विद्युत वाहिन्या असल्याने यातून विद्युत प्रवाह सुरू आहे किंवा नाही? यामुळे ग्रामस्थ यांच्या मनात भीती निर्माण झाली आहे, असे मिलिंद राणे यांनी सांगितले. हा खांब त्वरित येथून काढावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

### रोह्यात पावसाची हजेरी; वीजपुरवठा खंडित

**रोहा** : वरुणराजाच्या प्रतीक्षेत असलेल्या रोह्यात अखेर सोमवारी (दि. ८) मध्यरात्री पावसाने हजेरी लावली आहे. भुवनेश्वर व रोहा शहरासह तालुक्यातील काही ठिकाणी पाऊस पडला. आलेल्या पावसामुळे वीजपुरवठा खंडित झाला. यावेळी गाढ झोपेत असलेल्या नागरिकांना लाईट गेल्याने त्रास जाणवला. मे महिन्यात कामासाठी वीज मंडळाने शटडाऊन घेतले होते. असे असताना तासभार आलेल्या पावसाने बत्ती गुल झाली. त्यामुळे नेमके वीज मंडळाने कोणते काम केले असा सवाल विचारला जात आहे.

# खोपोलीतील मैदान होणार सुसज्ज आणि अद्ययावत

## नगर परिषद, आरडीसीएचा पुढाकार

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषद हद्दीतील, डी.पी. रोडवरील भव्य मैदान आता सुसज्ज व अद्ययावत होणार आहे. यासाठी पालिकेने रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)सोबत मैदानाच्या विकासाच्या दृष्टीने दीर्घकालीन सामंजस्य कराराने एकमताने ठराव मंजूर केला आहे.

नगराध्यक्ष कुलदीप शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, नगरसेवक तथा रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे (आरडीसीए) सदस्य समीर मसूरकर व इतर नगरसेवकांच्या नेतृत्वाखाली आणि आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, कार्याध्यक्ष यशवंत साबळे, सचिव प्रदीप नाईक व आरडीसीएचे सर्व पदाधिकारी, सदस्य यांच्या पुढाकाराने मैदानाच्या विकासाच्या संदर्भात ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहे.

यावेळी संजय तावडे, कौस्तुभ जोशी, शंकर दळवी, प्रदीप खलाटे, श्याम पाटील, मनोहर अहिर हेही उपस्थित होते.

याबाबत आरडीसीएचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील यांनी, खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीप शेंडे उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, नगरसेवक समीर मसूरकर यांच्यासह इतर नगरसेवकांनी क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी केलेल्या योगदानाबद्दल त्यांचे आपण आभार व्यक्त करत आहोत, असे म्हटले.

पाटील यांनी पुढे सांगितले की, रायगड जिल्ह्यात सध्या खूप कमी मैदाने शिल्लक आहेत. या मैदानांचे जतन व संगोपन करणे आता अत्यंत आवश्यक आहे. जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या वतीने दरवर्षी विविध वयोगटातील मुला–मुलींसाठी निवड चाचणी क्रिकेट स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी मैदाने खासगी कंपनी व क्रिकेट क्लबकडून भाड्याने घ्यावी लागतात. त्यात मैदाने काही ठराविक कालावधीसाठी किंवा त्यांच्या सोयीप्रमाणे जिल्हा क्रिकेट असोसिएशनला मिळतात. या सर्व अडचणींवर उपाय योजना करण्याच्या हेतूने जिल्हा क्रिकेट असोसिएशन वतीने जिल्ह्यातील विविध भागात हक्काची मैदाने मिळावी या दृष्टीने जोरदार प्रयत्न करत आहे.

सध्या महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आंतरजिल्हा निवड चाचणी क्रिकेट सामने व चांगल्या दर्जाचे खेळाडू घडवण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण शिबिराचे तसेच क्रिकेटच्या विकासाच्या संदर्भात विविध योजना जिल्ह्यात राबवल्या जात आहेत. उपलब्ध केलेल्या मैदानाच्या पुढील विकासाच्या बाबतीत एमसीएसुद्धा आर्थिक मदत करणार असल्याचे अनिरुद्ध पाटील यांनी सांगितले.



# स्व. अशोक साबळे यांची जयंती साजरी

## आठवणींना उजाळा, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव





**माणगाव : प्रतिनिधी**

माणगावच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात आपला ठसा उमटविणारे माजी आमदार स्व. अशोक साबळे यांच्या ८२व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रम अत्यंत भावनिक, हृदयस्पर्शी आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या साबळे विद्यालयातील मोरेश्वर सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात अशोकदादांच्या कार्याचा गौरव करत स्मृतींना अभिवादन करण्यात आले.

यानिमित्त गोरेगाव येथील ज्येष्ठ विचारवंत नंदकुमार मराठे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यांनी शिक्षण हीच समाजपरिवर्तनाची खरी ताकद आहे हा अशोकदादांचा विचार आजही तितकाच प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

दहावी व बारावी परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला साबळे परिवार, संस्थेचे पदाधिकारी, विविध विभागांचे प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक आणि नागरिक उपस्थित होते.

# माणगावात नालेसफाई

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील वॉर्ड क्र.१७मध्ये नालेसफाईचे काम नगराध्यक्ष सिराज परदेशी यांनी ग्रामस्थांच्या सहकार्याने पूर्ण केले.

राज्यात नैऋत्य मोसमी मान्सूनचे आगमन झाले असून कोकणात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो. त्यातच माणगाव नगरपंचायतीचा वॉर्ड क्रमांक १७चा परिसर माणगावमधून वाहणाऱ्या काळ नदीच्या जवळपासच आहे. या भागात जोरदार पर्जन्यवृष्टी झाल्यावर संपूर्ण परिसरात पाणी साचते. हे गांभीर्य व पुढील होणार धोका विचारात घेऊन या भागातील माजी नगरसेवक सिराज परदेशी यांनी पुढाकार घेत येथील ग्रामस्थ व कामगारांच्या सहकार्याने या ठिकाणी जेसीबी लावून दिवाणी व फौजदारी न्यायालय येथून पुढे बाजारटेप मोहल्ला व काळ नदीपर्यंत नालेसफाई करून घेतली.




पेण : येथील पंचायत समितीचे माजी सभापती तथा सामाजिक कार्यकर्ते व्ही.बी. पाटील यांच्या ७५व्या वाढिदवसनिमित्त अभीष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कीर्तनकार हभप राऊत महाराज यांच्या हस्ते व्ही.बी. पाटील व त्यांच्या सौभाग्यवती पुष्पा पाटील यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास आमदार रविशेठ पाटील, माजी खासदार धैर्यशील पाटील, जिल्हा परिषद सभापती वैकुंठ पाटील, सदस्य राजा केणी, प्रभाकर म्हात्रे, मिलिंद पाटील, अनंत गोंधळी, दीपक रानवडे श्रीकांत पाटील, नगरपालिकेच्या सभापती सुनीता जोशी, वाशी ग्रामपंचायतीचे सरपंच संतोष ठाकूर, माजी मुख्याध्यापक विखे पाटील आदी उपस्थित होते. सर्वांनी शुभेच्छा दिल्या.

## रेल्वेमध्ये विनातिकीट प्रवास करणाऱ्यांनो सावधान!

# मध्य रेल्वेकडून विशेष तपासण्या; महसूल जमा

**रोहा : प्रतिनिधी**

रेल्वेमध्ये विना तिकीट (अनाधिकृत) प्रवास करणाऱ्यांवर आळा घालण्यासाठी मध्य रेल्वेद्वारे बहुआयामी 'फोर्ट्रेस', 'एम्बुश' व इतर विशेष तपासण्या करीत असून या माध्यमातून एप्रिल ते मे या कालावधीत या विशेष तपासणीतून ६१ दिवसांत १४,७४४ प्रकरणांमधून ६२.०८ लाख रुपयांचा महसूल जमा झाला आहे. दररोज २४१ प्रकरणांमधून दररोज सरासरी १.०१ लाख रुपया महसूल दंड म्हणून जमा करण्यात येत आहे.

मध्य रेल्वेचा मुंबई विभाग छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कर्जत, खोपोली, कसारा, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पनवेल, उरण, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते माहीम आणि ठाणे ते वाशी या विस्तृत उपनगरीय जाळ्याद्वारे दररोज १८२० उपनगरीय सेवांमधून सरासरी ३९ लाख प्रवाशांची वाहतूक होते. यामध्ये १०८ वातानुकूलित उपनगरी सेवांचा समावेश आहे.

सुरक्षित व आरामदायी प्रवास देण्याव्यतिरिक्त मध्य रेल्वेवर नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व विनतिकीट प्रवासामुळे मोठ्या प्रमाणात महसुलाचे नुकसान करणाऱ्या अनियमित व विनातिकीट प्रवाशांवर रेल्वे लक्ष ठेवत असते. प्रवाशांची प्रचंड संख्या लक्षात घेता हे काम अधिकच कठीण होते. खऱ्या प्रवाशांना न्याय मिळावा यासाठी मध्य रेल्वे अनियमित प्रवासाची प्रकरणे शोधून काढण्यासाठी व दोषींना दंड आकारण्यासाठी विविध प्रकारच्या विशेष तपासण्या करते.ही विशेष तपासणी, नियुक्त तिकीट तपासणी तुकड्या व स्थानक कर्मचाऱ्यांकडून स्थानकांवर आणि गाड्यांमध्ये केल्या जाणाऱ्या नियमित तपासणीव्यतिरिक्त आहे.

फोर्ट्रेस, अंबुश, स्पॉट, इंटेन्सिव्ह आणि क्रॉस–कंट्री तपासणीच्या या मजबूत जाळ्याद्वारे मध्य रेल्वेने एक स्पष्ट संदेश दिला आहे की तिकीटविरहित व अनियमित प्रवासाबाबत कोणतीही सवलत दिली जाणार नाही. हे उपक्रम केवळ महसूल–संरक्षण मोहीम नसून प्रामाणिक आणि सद्भावनेने प्रवास करणाऱ्या प्रवाशांसाठी संपूर्ण निष्पक्षता सुनिश्चित करण्याच्या दिशेने उचललेली महत्त्वपूर्ण पावले आहेत. ते अधिक कठोरतेने सुरू राहतील. तथापि, सर्वोत्तम प्रयत्न करूनही दैनंदिन वाहतुकीदरम्यान प्रत्येक प्रवासी आणि प्रत्येक ट्रेन तपासणे व्यावहारिकदृष्ट्या अशक्य आहे.

जबाबदार नागरिक म्हणून ट्रेनमध्ये चढण्यापूर्वी योग्य तिकीट खरेदी करणे हे प्रवाशांचेही कर्तव्य आहे. केवळ स्वयंप्रेरित वर्तनच ही मोहीम पुढे नेऊ शकते. सर्व प्रवाशांना योग्य सेवा सुनिश्चित करू शकते. मध्य रेल्वे सर्व प्रवाशांना वैध तिकिटासह प्रवास करण्याचे आवाहन करत आहे.


# ऑनलाईनच्या जमान्यातही फिरत्या विक्रेत्यांची क्रेझ

## घरोघरच्या प्रत्यक्ष खरेदीला ग्रामीण भागात पसंती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

स्मार्टफोन, सोशल मीडिया, यूट्यूब आणि विविध ई–कॉमर्स प्लॅटफॉर्ममुळे ऑनलाईन खरेदी–विक्रीचा जमाना आला असला, तरी शहरांसह ग्रामीण भागात घरपोच वस्तू विकणाऱ्या फिरत्या विक्रेत्यांची लोकप्रियता आजही कायम आहे. ग्राहकांना वस्तू प्रत्यक्ष पाहून, तपासून आणि तात्काळ खरेदी करण्याची संधी मिळत असल्याने अनेकजण अजूनही या विक्रेत्यांना पसंती देत आहेत.





शहरांपासून ते दुर्गम खेड्यापाड्यांपर्यंत विविध वस्तू विकणारे फिरते व्यापारी रोज सायकल, मोटरसायकल, चारचाकी वाहन किंवा पायी घरोघरी फिरताना दिसतात. त्यांच्याजवळ घरगुती उपयोगाच्या वस्तू, प्लास्टिक साहित्य, कांदे–बटाटे, बिस्किटे, बेकरी पदार्थ, कपडे, चादरी तसेच इतर जीवनावश्यक वस्तू उपलब्ध असतात. त्यामुळे ग्राहकांना बाजारपेठेत जाण्याची गरज भासत नाही.

ग्रामीण भागात विशेषतः या विक्रेत्यांना मोठी मागणी असून अनेक कुटुंबे नियमितपणे त्यांच्याकडून खरेदी करताना दिसतात. पावसाळ्यानंतर ते मे महिन्याच्या अखेरपर्यंत गावोगावी फिरून व्यवसाय करतात.

अनेक फिरते व्यापारी ‘नवे घ्या आणि जुने द्या’ या संकल्पनेवरही व्यवसाय करतात. प्लास्टिकच्या वस्तूंच्या बदल्यात घरातील जुने कपडे घेण्याची अदलाबदल ग्रामीण भागात आजही सुरू आहे. त्यामुळे ग्राहकांनाही सोयीचा व्यवहार उपलब्ध होतो.

फिरत्या विक्रीच्या व्यवसायात मोठ्या प्रमाणात परप्रांतीय व्यापारी कार्यरत असल्याचे दिसून येते. स्थानिक विक्रेतेही काही प्रमाणात या व्यवसायात आहेत, मात्र बहुसंख्य व्यापारी इतर राज्यांतून आलेले असतात.

ऑनलाईन खरेदी–विक्रीचा प्रभाव वाढत असतानाही ग्रामीण भागातील लोकांशी थेट संपर्क साधून व्यवसाय करणारे हे फिरते विक्रेते आजही आपले अस्तित्व टिकवून आहेत. ग्राहकांशी जुळलेली नाती, घरपोच सेवा आणि वस्तू प्रत्यक्ष पाहून खरेदी करण्याची सुविधा यामुळे फिरत्या विक्रेत्यांची क्रेझ अद्याप कायम असल्याचे चित्र ग्रामीण भागात पहायला मिळत आहे.

### रोखीच्या व्यवहाराला दिले जाते प्राधान्य

फिरत्या विक्रेत्यांच्या व्यवसायात आजही रोखीच्या व्यवहाराचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. घरपोच सेवा आणि तत्काळ व्यवहारामुळे ग्राहक आणि विक्रेते दोघांनाही याचा फायदा होतो. अनेक विक्रेते मोठ्या शहरांतून घाऊक दराने माल खरेदी करून गावोगावी विक्री करतात आणि त्यातून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असतात.

## नेहा केकाणे मुख्याध्यापकपदी

**माणगाव : प्रतिनिधी**



गोरक्षनाथ शिक्षण प्रसारक मंडळ, जावळीच्या मुख्याध्यापका पदासाठी नेहा सतीश केकाणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

नेहा केकाणे या गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून २००९पासून त्यांनी विविध शैक्षणिक उपक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या विकासासाठी मोलाचे योगदान दिले आहे. अध्यापन क्षेत्रातील त्यांचा अनुभव, नेतृत्व क्षमता आणि शैक्षणिक व्यवस्थापनातील कौशल्यामुळे त्या शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांमध्ये विशेष लोकप्रिय आहेत. शिक्षणासोबतच सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान आहे. त्यांचे अभिनंदन होत आहे.

# पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**पेण : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिन तसेच राज्य पत्रकार संघ पेणचे अध्यक्ष विनायक पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त उंबर्डे येथे वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी उपनगराध्यक्ष निवृत्ती पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

पाटील यांनी पर्यावरणाचे महत्त्व अधोरेखित करत नागरिकांनी अधिकाधिक वृक्ष लागवड करून त्यांचे संवर्धन करण्याचे आवाहन केले. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय असंतुलन यावर मात करण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, ग्रामस्थ व पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते. सर्वांनी पर्यावरण रक्षणाची सामूहिक शपथ घेत परिसर हिरवागार करण्याचा संकल्प केला.



# टीम इंडियाचा विक्रमी विजय!

## अफगाणिस्तानचा एक डाव अन् ३०० धावांनी धुव्वा

**न्यू चंदिगड : वृत्तसंस्था**

न्यू चंडीगड येथील मुल्लानपूरच्या मैदानात रंगलेल्या एकमेव कसोटी सामन्यात भारतीय संघाने अफगाणिस्तानविरुद्ध एक डाव आणि ३०० धावांनी विजय नोंदवला आहे. कसोटी क्रिकेटमधील भारतीय संघाचा हा सर्वात मोठा विजय ठरला. याआधी २०१८मध्ये भारतीय संघाने वेस्ट इंडिजविरुद्ध एक डाव आणि २७६ धावांनी विजय मिळवला होता. आता टीम इंडियाने सर्वात मोठ्या विजयासह नवा विक्रम प्रस्थापित केला आहे.



पहिल्यांदा फलंदाजी करताना भारतीय संघाकडून कर्णधार शुबमन गिल १२६ (१७७) आणि उपकर्णधार लोकेश राहुल १०० (१६५) यांच्या शतकी खेळीशिवाय साई सुदर्शन ८१ (१०४), ऋषभ पंत ८१ (१२१) आणि वॉशिंग्टन सुंदरच्या ५२ (६८) अर्धशतकाच्या जोरावर टीम इंडियाने पहिल्या डावात ८ बाद ५६४ धावांवर पहिला डाव घोषित केला होता. या धावसंख्येचा पाठलाग करताना दोन वेळा फलंदाजी करूनही अफगाणिस्तानचा संघ ३०० धावांनी कमी पडला.

तिसऱ्या दिवशी अफगाणिस्तानच्या संघाने ५ बाद ११३ धावांवरून खेळाला सुरुवात केली होती, पण भारतीय गोलंदाजांसमोर अवघ्या काही तासांतच फक्त ३९ धावांत अफगाणिस्तानचा पहिला डाव १५२ धावांत आटोपला. त्यानंतर भारतीय कर्णधार शुबमन गिलने ४१२ धावांच्या मजबूत आघाडीसह अफगाणिस्तानला फॉलोऑन दिला. दुसऱ्या डावात अफगाणिस्तानचा संघ तिसऱ्या दिवसाच्या खेळातच ११२ धावांवर आटोपला.

भारतीय संघाने एक डाव आणि ३०० धावांनी विजय मिळवत कसोटीतील सर्वात मोठ्या विजयाची नोंद केली. तिसऱ्या दिवसाच्या खेळात आधी मानव सुथारचा जलवा पहायला मिळाला. त्याने पहिल्या डावात सहा विकेट्स घेतल्या. दुसऱ्या डावात वॉशिंग्टन सुंदर याने सर्वाधिक चार, तर कुलदीप यादवने तीन विकेट्स घेत आपल्या गोलंदाजीतील जादू दाखवून दिली.

## सूर्याचा मुंबई इंडियन्सला गुडबाय?

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघातून बाहेर झाल्यानंतर आता सूर्यकुमार यादव मुंबई इंडियन्स संघाचीही साथ सोडणार असल्याची चर्चा रंगली आहे.



सूर्यकुमार यादवने मुंबई इंडियन्सकडून खेळताना आपल्या आयपीएल कारकिर्दीची सुरुवात केली होती. त्यानंतर तो कोलकाता नाईट रायडर्सचा भाग बनला. २०१८पासून तो मुंबई इंडियन्ससाठी मुख्य फलंदाजाची भूमिका पार पाडत आहे. भारतीय संघातून बाहेर पडल्यानंतर त्याने मुंबई इंडियन्सची साथ सोडणार असल्याचे संकेत दिले आहेत. त्याने आपल्या अधिकृत इन्स्टाग्राम आणि एक्स अकाऊंटवरुन मुंबई इंडियन्सला अनफॉलो केले आहे. यासह मुंबई इंडियन्सच्या सर्व पोस्टदेखील डिलीट केल्या आहेत. त्यामुळे सूर्या आता आगामी हंगामाआधी मुंबई संघाची साथ सोडणार की काय? अशी चर्चा आहे.

## नेमबाज मल्हार कदमला राज्यस्तरीय स्पर्धेत तीन कांस्यपदके

**अलिबाग : प्रतिनिधी**

कॅप्टन एस.जे. इझेकल मेमोरियल महाराष्ट्र स्टेट शूटिंग चॅम्पियनशिप या नेमबाजी स्पर्धेत कुलाबा रायफल व पिस्टल शूटिंग क्लबचा युवा नेमबाज मल्हार राहुल कदम याने तीन कांस्यपदके पटकावली.






महाराष्ट्र रायफल असोसिएशन (एमआरए) आयोजित या स्पर्धेत मल्हारने १० मीटर एअर रायफल प्रकारात ४००पैकी ३८२ गुणांची नोंद केली. या कामगिरीच्या जोरावर त्याने युथ, सब-युथ आणि ज्युनियर या तिन्ही गटांत प्रत्येकी एक अशी एकूण तीन कांस्यपदके आपल्या नावावर केली.

स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ वरळी येथील शूटिंग रेंजवर उत्साहात पार पडला. यावेळी एमआरएचे अध्यक्ष अर्जुन पुरस्कार विजेते अशोक पंडित, सचिव शीला कानूंगो, सदस्य चंद्रकांत पुजारी तसेच विधान परिषद सदस्य दुष्यंत चतुर्वेदी उपस्थित होते.

सेंट मेरी हायस्कूलमध्ये इयत्ता सातवीत शिक्षण घेणाऱ्या मल्हार कदमला प्रशिक्षक योगेश गडमाळे, मेहुल राठोड, मंदार गडकरी आणि यतिराज पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचे या यशाबद्दल अभिनंदन होत आहे.

## अलेक्झांडरला पहिलेवहिले ग्रँड स्लॅम जेतेपद



**पॅरिस : वृत्तसंस्था**

दीर्घ प्रतीक्षेनंतर अखेर जर्मन टेनिस स्टार अलेक्झांडर झ्वेरेव्हने ग्रँड स्लॅम जेतेपदाचा दुष्काळ संपवला आहे. फ्रेंच ओपन पुरुष एकेरीच्या अत्यंत थरारक आणि अटीतटीच्या अंतिम सामन्यात झ्वेरेव्हने इटलीच्या फ्लॅव्हिओ कोबोलीचा ६-१, ४-६, ६-४, ६-७ (५-७), ६-१ असा पाच सेटच्या महासंग्रामात पराभव केला. कारकिर्दीतील चौथ्या प्रयत्नात झ्वेरेव्हने आपले पहिलेवहिले ग्रँड स्लॅम जेतेपद पटकावत इतिहास रचला.

या ऐतिहासिक विजयासह झ्वेरेव्हने टेनिस जगतात नवा विक्रम नोंदवला आहे. १९३७मध्ये हेनर हेनकेल यांनी फ्रेंच ओपन जिंकली होती. त्यानंतर क्ले कोर्टवर जेतेपद मिळवणारा झ्वेरेव्ह हा पहिलाच जर्मन पुरुष खेळाडू ठरला आहे तसेच २०२४मधील ऑस्ट्रेलियन ओपनमध्ये यानिक सिन्नेरने मिळवलेल्या यशानंतर पहिले ग्रँड स्लॅम जिंकणारा झ्वेरेव्ह हा जगातील पहिलाच नवा खेळाडू ठरला आहे.

सामन्याच्या अंतिम क्षणांमध्ये कोबोली पूर्णपणे बॅकफूटवर गेला होता. झ्वेरेव्हला विजयासाठी तीन चॅम्पियनशिप पॉईंट्स मिळाले. कोबोलीने पहिला पॉईंट वाचवत सामन्यात रंगत आणण्याचा प्रयत्न केला, मात्र एका निर्णायक क्षणी स्मॅश मारण्यात त्याला अपयश आले आणि सामना त्याच्या हातातून निसटला. पुढच्याच क्षणी झ्वेरेव्हने विजयी गुण मिळवत जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. विजय मिळवताच झ्वेरेव्ह अत्यंत भावुक झाला आणि कोर्टवरच कोसळला. डोळ्यात आनंदाश्रूसह त्याने या ऐतिहासिक क्षणाचा आनंद साजरा केला.

## बांगलादेशविरुद्धच्या मालिकेतूनही मिचेल मार्श 'आऊट'

**सिडनी : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये लखनऊ सुपरजायंट्ससाठी सलग दोन महिने खेळणारा ऑस्ट्रेलियाच्या क्रिकेट संघाचा मिचेल मार्शने बांगलादेश दौऱ्यातील वनडे मालिकेतूनही माघार घेतली आहे. त्यामुळे क्लब की देश हा वाद आता सातत्याने ऐरणीवर येतो आहे.



मिचेल मार्शला कारकिर्दीत दुखापतींनी सातत्याने सतवले आहे. कारकिर्दीत तो जेवढे सामने खेळला आहे त्याच्यापेक्षा चौपट सामन्यात तो खेळू शकलेला नाही. दुखापतींमुळे मार्शच्या उपलब्धेतविषयी नेहमीच साशंकता असते. आयपीएल सुरू असतानाच ऑस्ट्रेलियाचा संघ पाकिस्तान दौऱ्यावर रवाना झाला, तेव्हा मार्शकडे टी-२० संघाची धुरा होती, मात्र दुखापतीतून न सावरल्याने त्याच्याऐवजी जोश इंगलिसकडे कर्णधारपद सोपवण्यात आले. मार्श आता बांगलादेशात वनडे मालिकेतही खेळणार नाही.

## मानव सुथारने पदार्पणाच्या कसोटीत रचला इतिहास!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानविरुद्धच्या कसोटी सामन्यात भारताचा युवा डावखुरा फिरकीपटू मानव सुथार याने पदार्पणातच इतिहास रचला. त्याने पहिल्या डावात ३३ धावांत सहा विकेट्स घेत संधीचे सोने करून दाखवले. कसोटी पदार्पणातील पहिल्याच डावात पाच किंवा अधिक विकेट्स घेणारा तो भारताचा १०वा आणि २१व्या शतकातील अमित मिश्रानंतरचा दुसरा गोलंदाज ठरला आहे.

२१व्या शतकात मानव सुथार आधी अमित मिश्रा याने २००८मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या पदार्पणाच्या सामन्यातील



पहिल्या डावात ७१ धावांत पाच विकेट्स घेतल्या होत्या. त्यानंतर तब्बल १८ वर्षांनी मानव सुथारने हा पराक्रम करुन दाखवला आहे. २१व्या शतकात पदार्पणाच्या कसोटी सामन्यात पाच किंवा अधिक विकेट्स घेणाऱ्या गोलंदाजांच्या यादीत आर. अश्विन, मोहम्मद शमी आणि अक्षर पटेल यांचाही समावेश होता, पण या तिघांनी दुसऱ्या डावात पाचपेक्षा अधिक विकेट्स घेतल्या होत्या.

१९८८मध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या पदार्पणाच्या कसोटीत नरेंद्र हिरवानी यांनी दोन्ही डावांत मिळून तब्बल १६ विकेट्स घेतल्याचा विक्रम आहे. पदार्पणाच्या कसोटी सामन्यात सर्वाधिक विकेट्स घेण्याचा हा जागतिक विक्रम आजही संयुक्तपणे त्यांच्या नावावर आहे. भारतीय दिग्गजाशिवाय ऑस्ट्रेलियाचे बॉब मॅसी या गोलंदाजाने १९७२मध्ये पदार्पणाच्या कसोटीत १६ विकेट्स घेतल्या होत्या.

## रायगडच्या नेमबाजांची प्रि नॅशनल शूटिंग चॅम्पियनशिपसाठी निवड

### महाराष्ट्र रायफल संघटनेचे करणार प्रतिनिधित्व

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वरळी (मुंबई) येथील २९व्या कॅप्टन एस.जे.एझिकल शूटिंग नेमबाजी चॅम्पियनशिप स्पर्धेत सिद्धांत रायफल व पिस्तूल शूटिंग क्लब रायगडचे नेमबाज प्रितम पाटील, संदेश थळे, अब्दुल रहिम शेख, मिलिंद पांचाळ यांनी ५० मीटर रायफल प्रोनमध्ये, तर अस्मिता झा हिने १० मीटर एअर पिस्तूलमध्ये नेत्रदीपक कामगिरी करत निर्णायक गुण मिळवून यश संपादन केले आहे. हे सर्व नेमबाज आता ऑल इंडिया (प्रि नॅशनल लेव्हल) शूटिंग चॅम्पियनशिप महाराष्ट्र



रायफल संघटनेचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

या नेमबाजांना क्लबचे सेक्रेटरी, प्रशिक्षक, विख्यात राष्ट्रीय नेमबाज किशन खारके तसेच राष्ट्रीय नेमबाज, आयएसएसएच कोच अलंकार कोळी यांचे मार्गदर्शन लाभले. प्रशिक्षकांच्या उत्तम कामगिरीमुळे इतर जिल्ह्यातील खेळाडूही प्रशिक्षण घेण्यासाठी सिद्धांत रायफल व पिस्तूल शूटिंग क्लब रायगड रेंजवर येत असतात. आंतरराष्ट्रीय नेमबाज, सिल्व्हर मेडलिस्ट डबल ट्रॅप शॉटगन शूटर अवनी कोळी, शरयू दळवी ही याच क्लबचे नेमबाज तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर बरेच नेमबाज क्लबचे नाव गाजवत आहेत.

ऑल इंडिया स्पर्धेत सिद्धांत रायफल व पिस्तूल शूटिंग क्लबच्या नेमबाज यांची निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. क्लबचे अध्यक्ष विजय खारकर, सचिव किशन खारके, खजिनदार प्रितम पाटील, महेश फुलोरे, अजिंक्य चौधरी, समाधान घोपरकर, श्रीराम पाटील, राजू मुंबईकर, ऋषिकेश केणी व इतर सदस्य तसेच इंडियन मॉडेल स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेजचे संचालक यांनी त्यांची निवड झाल्याबद्दल शुभेच्छा दिल्या आहेत.

## रहमत शाहची एकाकी झुंज

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

न्यू चंदीगड येथे झालेल्या भारताविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात अफगाणिस्तानचे सर्वच



फलंदाज फ्लॉप ठरले, पण चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या रहमत शाहने एकाकी झुंज देत ६० धावांची खेळी केली. यासह त्याने भारताविरूद्ध मोठा रेकॉर्ड नावे केला आहे.

भारतीय गोलंदाजांचा सामना करताना अफगाणिस्तानच्या फलंदाजांची पळता भुई थोडी झाली. अशा वेळी चौथ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या रहमत शाहने एक बाजू धरुन ठेवत एकाकी झुंज दिली. त्याने १३६ चेंडूंचा सामना करता नऊ चौकार आणि एक षटकाराच्या साहाय्याने ६० धावांची खेळी केली. या खेळीसह तो कसोटी क्रिकेटमध्ये अफगाणिस्तानकडून खेळताना भारताविरुद्ध अर्धशतकी खेळी करणारा पहिलाच फलंदाज ठरला आहे. याशिवाय तो अफगाणिस्तानसाठी कसोटी क्रिकेटमध्ये एक हजार धावा पूर्ण करणाराही पहिलाच फलंदाज ठरला आहे.

## फिफा विश्वचषकात 'ट्रिओन्डा' आकर्षण



**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

फुटबॉलच्या मैदानावर धावणाऱ्या खेळाडूंच्या शरीरावर सेन्सर्स असतात. प्रशिक्षकांकडे कृत्रिम बुद्धिमत्तेवर (एआय) आधारित विश्लेषणाची साधने असतात आणि रेफरी अर्थात पंचांकडे व्हिडीओ असिस्टंट रेफरी (व्हीएआर) प्रणाली असते. आता या यादीत आणखी एका घटकाची भर यंदाच्या फिफा २०२६मध्ये पडणार आहे, ती म्हणजे एआय फुटबॉल!

फिफा विश्वचषकासाठी अधिकृत फुटबॉल म्हणून सादर करण्यात आलेला 'ट्रिओन्डा' हा केवळ फुटबॉल नाही, तर तो एक अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक उपकरणच आहे. त्यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेला पूरक अशी सेन्सर प्रणाली बसवण्यात आली असून ती प्रत्येक क्षणी फुटबॉलची हालचाल, वेग, दिशा आणि स्पर्श यांची माहिती नोंदवते.

फुटबॉलचा शोध लागून दीडशे वर्षांहून अधिक काळ झाला, मात्र पहिल्यांदाच फुटबॉल स्वतःच खेळातील निर्णय प्रक्रियेचा महत्त्वाचा भाग असणार आहे. त्यामुळे ट्रिओन्डा हा केवळ २०२६ फिफा विश्वचषकाचा केवळ अधिकृत फुटबॉल नसून तो क्रीडा क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या क्रांतीचे प्रतीक ठरला आहे.

ट्रिओन्डाची सर्वात महत्त्वाची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे त्याची रचना. या चेंडूत अवघी चार पॅनेल्स वापरण्यात आली आहेत. फुटबॉलच्या इतिहासात इतक्या कमी पॅनेल्सचा वापर यापूर्वी कधीही झालेला नव्हता. पॅनेल्सची संख्या कमी केल्याने चेंडूच्या पृष्ठभागावरील शिवणरेषा कमी होतात. त्यामुळे हवेत निर्माण होणारा रोध नियंत्रित राहतो आणि फुटबॉल वैज्ञानिकदृष्ट्या हवेत अधिक स्थिर राहातो.

## वैभव सूर्यवंशीसाठी सूर्यकुमार यादवची खास पोस्ट



**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये आपल्या स्फोटक फलंदाजीने क्रिकेटजगताला थक्क करणाऱ्या १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीची अखेर भारतीय क्रिकेट संघात निवड झाली. भारतीय टी-२० संघाचा माजी कर्णधार आणि स्टार फलंदाज सूर्यकुमार यादव याने सोशल मीडियावर एक खास पोस्ट शेअर करत वैभवचे अभिनंदन केले आहे.

बीसीसीआयने आगामी आयर्लंड, इंग्लंड दौरा आणि आशियाई क्रीडा स्पर्धांसाठी भारतीय संघाची घोषणा केली. या संघात नाव समाविष्ट होताच वैभववर संपूर्ण क्रीडाविश्वातून कौतुकाचा आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. या पार्श्वभूमीवर सूर्यकुमारने आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीमध्ये लिहिले की, "तू ही संधी कमावली आहेस आणि तीही अतिशय शानदार पद्धतीने. तुझ्या पुढील क्रिकेट प्रवासासाठी मी खूप उत्सुक आहे." सूर्याची ही भावूक आणि प्रेरणादायी पोस्ट सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून चाहत्यांमध्ये याची जोरदार चर्चा आहे.

वैभव सूर्यवंशीची भारतीय संघातील निवड ही त्याच्या आयपीएलमधील अविश्वसनीय कामगिरीचे फळ आहे. आयपीएल २०२६च्या हंगामात वैभवने गोलंदाजांचा धुव्वा उडवत तब्बल ७७६ धावा कुटल्या. विशेष म्हणजे, या धावा करताना त्याने ७२ गगनचुंबी षटकार ठोकले. या धमाकेदार कामगिरीच्या जोरावर त्याने प्रतिष्ठेच्या ऑरेंज कॅपसह एकूण पाच वैयक्तिक पुरस्कारांवर आपले नाव कोरले. या कामगिरीनंतर त्याची भारतीय संघात निवड होणार हे जवळपास निश्चित मानले जात होते.

## लॉर्ड्सवर तीन दिवसांत ४० विकेट्स! इंग्लंडचा न्यूझीलंडवर विजय

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिली कसोटी खरंतर तिसऱ्या दिवशीच संपणे अपेक्षित होते, मात्र क्रिकेटची पंढरी समजल्या जाणाऱ्या लॉर्ड्सवर पावसामुळे चौथ्या दिवशी टेस्ट मॅचचा निकाल लागला. पहिली कसोटी जिंकत इंग्लंडने तीन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.



चेंडूला स्विंग आणि ढगाळ पावसाळी वातावरण यामुळे न्यूझीलंडने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला. हॅरी ब्रुकच्या अर्धशतकाचा अपवाद वगळता इंग्लंडच्या बाकी बॅट्समननी न्यूझीलंडच्या बॉलिंगसमोर शरणागती पत्करली. ब्रुकने १० चौकारांसह ५६ धावांची खेळी केली. इंग्लंडचा डाव १४० धावांतच आटोपला. न्यूझीलंडतर्फे कायले जेमिसनने पाच, नॅथन स्मिथने तीन आणि विल्यम ओ रुकने दोन विकेट्स घेतल्या.

असमान उसळी तसेच अचानक चेंडू खाली राहणाऱ्या खेळपट्टीवर न्यूझीलंडच्या बॅट्समनची दाणादाण उडाली. ओली रॉबिन्सनने पाच विकेट्स पटकावत न्यूझीलंडच्या डावाला खिंडार पाडले. कायले जेमिसनने ३८ आणि ग्लेन फिलीप्सने ३४ धावांची खेळी करत प्रतिकार केला. इंग्लंडकडून जोश टंगने तीन, तर गस अटकिन्सनने दोन विकेट्स घेत रॉबिन्सनला चांगली साथ दिली. यासह इंग्लंडला २७ धावांची अल्प आघाडी मिळाली.

इंग्लंडने दुसऱ्या डावात खेळपट्टीचा सन्मान करत फलंदाजी केली. पदार्पणवीर इमिलो गे याने शानदार अर्धशतक झळकावले. जेमी स्मिथने ३९ आणि बेन डकेटने ३३ धावा करत गे याला चांगली साथ दिली. इंग्लंडचा दुसरा डाव २२६ धावांत आटोपला. न्यूझीलंडतर्फे नॅथन स्मिथने सहा विकेट्स पटकावल्या. न्यूझीलंडला २५४ धावांचे लक्ष्य मिळाले.

खेळपट्टीची स्थिती पाहता न्यूझीलंडला हे आव्हान झेपणे अवघड होते. उत्तम तंत्रकौशल्य असलेले बॅट्समन संघात असूनही न्यूझीलंडचा दुसरा डाव १३८ धावांतच गडगडला. ग्लेन फिलीप्सने नाबाद ४४ आणि डेव्हॉन कॉनवेने ४१ धावांची खेळी करत झुंज दिली. इंग्लंडतर्फे गस अटकिन्सनने पाच विकेट्स पटकावल्या. ओली रॉबिन्सन आणि जोश टंग यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेत त्याला चांगली साथ दिली. कमी धावसंख्येच्या या सामन्यात इंग्लंडने पहिली टेस्ट ११५ धावांच्या प्रचंड फरकाने जिंकली.

टेस्टच्या पहिल्या दिवशी १६ तर दुसऱ्या दिवशी १७ विकेट्स पडल्या. पावसामुळे बाधित तिसऱ्या दिवशी जेमतेम काही षटकांचा खेळ होऊ शकला. त्यातही दोन विकेट्स पडल्या. चौथ्या दिवशी उर्वरित पाच विकेट्स पडल्या आणि टेस्ट मॅच संपली.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –**मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com